अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.

द्वारा संचालित

श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय,

मंगरुळपीर, जि.वाशिम.



# अमरवाणी

## २०१९ - २०२०

Scanned with OKEN Scanner

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.

द्वारा संचालित

श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि वाशिम.



# अमरवाणी

## २०१९-२०



Scanned with OKEN Scanner




# श्री.वसंतरावजी नाईक साहेब



Scanned with OKEN Scanner

# आमचे भाग्य विधाता

## संस्थापक




दानशूर श्री.अमरसिंग हरिचंद नाईक

आसोला खुर्द ता.मानोरा जि.वाशिम



Scanned with OKEN Scanner



मा.श्री.आत्माराम अमरसिंग राठोड



Scanned with OKEN Scanner

# प्राचार्य



## डॉ.एल.के.करांगळे



Scanned with OKEN Scanner

# ✻ मनोगत ✻

मंगरुळपीर सारख्या ग्रामिण भागात अमर शिक्षण प्रसारक संस्थेने १९७१ साली दानशूर बापू श्री अमरसिंगजी नाईक यांनी गरीब मुला–मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी ही उत्कट इच्छा असल्यामुळे कार्यवाहक संस्थापक मा.श्री आ.अ.राठोड साहेबांनी अमर शिक्षण प्रसारक संस्था स्थापन करुन श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालयाचे रोपटे लावले. पाहता पाहता आज या रोपाचा वटवृक्ष होवून भरलेला आहे. शिक्षणाचा पवित्र वसा घेतलेले हे महाविद्यालय अमरावती ते वाशिम या महामार्गावर असून बस स्थानकाच्या अगदी जवळ आहे. त्यामुळे ग्रामिण भागातील गरीब मुला मुलींच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला.

रुढी परंपरेचे पास दिर्घकाळ टिकूण न राहण्यांसाठी शिक्षणासारखे प्रभावी शस्त्र निश्चित कारणीभूत ठरते. जागतिकीरणामुळे जनजीवन ढवळून निघाले, जगाचे रुपांतर जणू खेडयात झालं त्यातून स्पर्धा वाढली त्याचा परिणाम मानवी जीवनावर झाला परंतू शिक्षणामुळे जीवनाकडे बघण्याचा विशाल व सकारात्मक दृष्ट्रीकोन निर्माण होवू लागला. ग्रामिण आणि शहरी भागातून आजची पिढी मोठया प्रमाणात शिकू लागली आहे.

महाविद्यालयात विविध प्रकारचे कार्यक्रम सातत्याने होत असतात राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक असून दरवर्षी वैशिष्टयपूर्ण विशेष शिबिराचे महाविद्यालयाच्या वतीने आयोजन करण्यांत येते. थोर राष्ट्पुरुषांच्या जयंती, पुण्यतिथीचा कार्यक्रम व इतरही प्रासंगीक कार्यक्रम होत असतात त्यामुळे सांस्कृती संवर्धन होण्यांस मदत होते. याच बरोबर शारीरीक शिक्षण विभागाच्या वतीने खेळ व क्रिडा स्पर्धेचे आयोजनही केल्या जाते. महाविद्यालयातील विद्यार्थ्याकरीता स्वतंत्र संगणक कक्ष, सुसज्ज ग्रंथालय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केन्द्र, पी.एच.डी पदवी करिता संशोधन केन्द्राची स्थापना मा.श्री आ.अ.राठोड साहेबांच्या मार्गदर्शनाने करण्यांत आली आहे. या सर्व सुविधेचा लाभ विद्यार्थांना मिळेल

महाविद्यालय विकासाची बांधिलकी सर्वांनी अंतकरणापासून स्वीकारली असल्यामुळे व संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री आ.अ.राठोड साहेब यांची पूर्ण साथ असल्यामुळे अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात प्रगतीचे एक एक पाऊल हे महाविद्यालय पुढे टाकीत आहे. प्रगतीचा हा ओघ सतत पुढे सरकत राहील, असा विश्वास आहे.

डॉ.एल.के.करांगळे
प्राचार्य
श्री व.ना.कला व श्री अ.ना.वाणिज्य
महाविद्यालय मंगरुळपीर जि वाशिम



Scanned with OKEN Scanner

# ✻ संपादकीय ✻

''वार्षिकांक'' वाचकाच्या हाती सुपूर्द करतांना अत्यानंद होत आहे. महाविद्यालयातील जीवनात अनेक जबाबदारीच्या रूपानं विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते इतर सवयीप्रमाणेच वाचन लेखनाची आवड विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावी, हा यामागील प्रमाणिक हेतू आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चौकस बुध्दीला चालना मिळावी त्याची सर्जनशीलता कार्यान्वित व्हावी व आजूबाजूच्या परिस्थितीचे सुक्ष्म अवलोकन त्याला करता यावे, जेणेकरुन तो विचारप्रवण होवून होणाऱ्या बदलाचे सुक्ष्म निरीक्षण त्याला करता येतील. कळत नकळत आपल्या अवती भवती अनेक बऱ्या वाईट गोष्टी घडत असतात त्यातून चांगल्या वाईट गोष्टी घडत असतात त्यातून चांगल्या वाईट विचारांचा अन्वयार्थ घेण्यासाठी मानसिक पातळी वाढीस लागावी ''सद् रक्षणाय खलनिग्रहणाय'' या उक्तीनुसार विचार स्वांतत्र्याला गती मिळावी '' काळ तर मोठा कठीण आला'' असे जाणते मंडळी नेहमी म्हणत असते.

खरंच एकीकडे आजच्या युवा पिढीसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. वाढते औद्योगिकरण, लोकसंख्या आणि सरकारचे आर्थिक नियोजन धोरण या सर्वांमध्ये सामान्य माणूस भरडला जातो आहे. पूर्वापार चालत आलेली शिक्षण पध्दती बेकारांची वाढती संख्या यांची योग्य ती सांगड न घातल्यामुळे येणारी युवा पिढी, काळाच्या ओघात आपले अस्तित्व टिकविणार की नाही. नोकरीचे दरवाजे सध्या तरी त्यांच्यासाठी बंद आहेत. मग सारा वेळ कुठे घालवायचा हा एक मोठा प्रश्न आहे. त्यातूनच पुढे दहशतवादाला खतपाणी मिळेल की काय? ही भिती डोळयाआड करता येत नाही.

महाविद्यालयाच्या विकासासाठी जिज्ञासू वृत्तीने प्रयत्न करणारे संस्थेचे अध्यक्ष, मा. श्री आ.अ.राठोड साहेब यांच्या मार्गदर्शनाने व महाविद्यालयाचे कर्तव्यतत्पर प्राचार्य मा.डॉ.एल.के. करांगळे यांच्या सहकार्याने व कुशल प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी प्रत्यक्ष सहभागाने तसेच महाविद्यालयातील प्रेमळ व शिस्तप्रिय विद्यार्थ्यांच्या अक्षर साहित्याने या वार्षिकांक च्या प्रकाशनास मदत झाली. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

डॉ.एस.ए.राठोड
मराठी विभाग
श्री व.ना.कला व श्री अ.ना.वाणिज्य
महाविद्यालय मंगरुळपीर जि वाशिम

टिप :— 'अमरवाणी' वार्षिकांक मधील लेख व कवितेतून व्यक्त झालेली मते सबंधिताची आहे.



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | मराठी भाषा काल आणि आज | — कु दिव्या यशवंतराव वासुळे |
| २) | हे कुठेतरी थांबायला हवं | — कु अंकिता माणिकराव खिराडे |
| ३) | सुभाषचंद बोस | — अजय श्याम चव्हाण |
| ४) | नितीन बानगुडे यांचे प्रोत्साहन | — कु अंजली महादेव डोके |
| ५) | प्रेम | — धिरज मुकुंदराव अंकुशकर |
| ६) | कर्तव्याने घडतो माणूस | — रवि उदयसिंग राठोड |
| ७) | प्रेम कुणावर करावे? | — राजेश विनोद जाधव |
| ८) | जीवनाचा प्रवास | — कु प्रतिक्षा प्रदिप राठोड |
| ९) | संस्कृतीचे भक्त | — कु दिव्या यशवंत मासुळे |
| १०) | भ्रूणहत्या थांबवा मुलगी वाचवा | — कु प्रिती प्रदिप राठोड |
| ११) | अदृश्य बाबा | — कु एच.आर.रनबावळे |
| १२) | कर्जबाजारी शेतकरी | — कु एच.आर.रनबावळे |
| १३) | मी मुलगी | — कु सपना प्रकाश श्रृंगारे |
| १४) | माझे शिक्षक | — कु भाग्यश्री हरीओम लुंगे |
| १५) | माझे महाविद्यालय | — कु अंजली साहेबराव भोयर |
| १६) | पैसा | — कु अंजली साहेबराव भोयर |
| १७) | वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सीए व्हायचं | — चेतन गणेश दोड |
| १८) | राष्ट्रगीता करता आजच्या काळात हिंसा की अहिंसा गरजेची | — कु स्वाती गजानन बुधे |
| १९) | पर्यटन आणि विकास | — कु पल्लवी शरद इंगोले |
| २०) | आई | — कु गायत्री अनिल कडंगे |
| २१) | शेतकरी, बाबा विठ्ठल | — निखिल गावंडे |
| २२) | माझा शेतकरी राजा | — गितेश राजेंद्र पवार |
| २३) | आयुष्य | — जगदिश मारुती गव्हाणे |
| २४) | अशी किर्ती माझ्या शिवबाची | — कु निकीता सुनिल अवचार |
| २५) | मुलगी | — कु गायत्री अनिल कडंगे |
| २६) | माझे विद्यालय | — कु तेजस्विनी सिध्देश्वर घाटे |
| २७) | शेतकरी | — कु तेजस्विनी सिध्देश्वर घाटे |
| २८) | जीवन गीत | — कु.जयश्री गजानन फलटणकर |
| २९) | विधरुपी अंगठी | — कु.जयश्री गजानन फलटणकर |
| ३०) | निर्णय व अनुभव | — कु.वैष्णवी छगनलाल गव्हाणे |




Scanned with OKEN Scanner

३१) मीच जीवन — कु.गायत्री विनोद सावळे

३२) तापमान वाढते पृथ्वीवर — कु.निकीता राजेश पांडे

३३) मायेची भाकरी — कु.नंदिनी अशोक सुरजुसे

३४) बहीण — कु.नंदिनी अशोक सुरजुसे

३५) मैत्रीण — कु.नंदिनी अशोक सुरजुसे

३६) जिंदग — कु.पल्लवी काशिनाथ धुर्वे

३७) वंदन गीत — वैभव सिध्दार्थ इंगोले

३८) SUCCESS — कु.पुजा जगदिश गावंडे

३९) SUCCESS — कु.आचल मनोहर भड

४०) One of Power — कु.अंकिता रामेश्वर लुंगे

४१) संत गाडगे बाबा यांचे सामाजिक कार्य — प्रा.डॉ.एस.ए.राठोड

४२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शेतकऱ्यांना न्याय — प्रा.डॉ.एन.बी.मठपती

४३) कार्याचे विभागीकरण — प्रा.ए.एन.गजभिये

४४) भारत रशिया मैत्री — प्रा.सी.एन.घुगे

४५) काश्मीर प्रश्नी डॉ.आंबेडकरांची भूमिका — प्रा.पी.आर.तायडे

४६) खेळाद्वारे व्यक्तीमत्व विकास — प्रा.एस.जी.ढाकुलकर

४७) A Study of English proverb in language & literature — प्रा.पी.डी.श्रृंगारे

४८) वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी आयकर बचतीचे मार्ग — प्रा.डॉ.एल.एस.हुरणे

४९) ग्रंथालयात संगणकाचा उपयोग — डॉ.डी.जी.राठोड

५०) Make English language student- friendly Through modern Technology — प्रा.पी.एन.जाधव

५१) महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईकांचे योगदान — प्रा.डी.बी.जाधव

५२) पैशाची उत्क्रांती — प्रा.व्ही.डी.कोवे

५३) भारतीय तरुण नवयुवक — प्रा.एस.एन.टापरे

५४) स्त्री — प्रा.कु.व्ही.यु.इंगोले




Scanned with OKEN Scanner

# मराठी भाषा काल आणि आज

"लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी, एवढया जगात माय, मानतो मराठी",

"ओ माय गॉड "किती लेट झालाय! असं म्हणत माझी मैत्रीण वाऱ्यासारखे निघून गेली. माझ्या मनात मात्र विचारांचे काहूर उडून गेली. एका वाक्यात तीन वेळा माझ्या मातृभाषेला भोसून हा सरळसरळ भर रस्त्यावर खून केल्यासारखं झालय, मराठी माझी तोपर्यंत जिवंत आहे. जोपर्यंत शिवाजी महाराज की जय म्हटल्यावर ज्याच्या तोंडून अचूक जय हा शब्द येतो ना तो मराठी म्हटलेला शब्द... माझी माय मराठी. मराठी भाषा ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. मराठी भाषेला माय माऊली असेही म्हणतात. कुणीतरी बोलतो सहज बोलून जातो. "देअर इज तुळशिवृंदावन" अरे, कुठे जातोय आपण काय हे मराठी बोलणं कमीपणाचं वाटू लागल्या की काय असं वाटू लागतं. मराठी भाषा थोडी थोडी करुन लोपपावत चालली की काय हा मोठा प्रश्न आज आपल्यासमोर उभा आहे. मराठी साहित्य निर्मितीस प्रारंभ झाला तो सामान्यता दहाव्या—अकराव्या शतकात व तो प्रामुख्याने केला, तो महानुभव पंथ यांनी त्यांनी मराठी चा वापर संस्कृत भाषेच्या जागी करण्यांस प्रारंभ केला. हे ऐतिहासिक दृष्टया मराठी भाषा अशी सुरु झाली. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आलं व मुंबईची राजधानी झाली परंतू त्या अगोदर परप्रांतातील अमराठी लोकांनी मुंबईत मुळ धरले एवढेच! तर त्यांचा वाढता प्रभाव जाणवू लागला. अन्य प्रांतात व्यवहारासाठी तिथली भाषा येणे आवश्यक आहे तसे महाराष्ट्रात नाही मराठी शिवाय महाराष्ट्रात अन्य प्रांतातील पिढयानपिढया राहू शकतात. हा आमच्या भाषेवर अन्याय आहे. असे म्हणण्याचे धाडस कोण करेल! वर्षानुवर्ष महाराष्ट्रात राहूनही आमची भाषा इतरांना येत नाही.

मातृभाषिक लोकसंख्येचे संतुलन बिघडले तर कालांतराने त्यांचे परिणाम दिसतात मराठी लोकांचे वर्चस्व मराठी भाषिक राज्यात अशा काहीतरी होत राहीले की महाराष्ट्रात मुंबई आहे पण मुंबईतील महाराष्ट्र कुठे आहे? असे खेदाने म्हणण्याची वेळ येते, हे गेल्या पन्नास वर्षात दर दहा वर्षानी महाराष्ट्राचे चित्र कसे बदलले आहे व मराठी भाषेची परिस्थिती कुणीकडे झुकत आहे. याचा शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पुढील विचार वाटते.

भारतीय जनगणना नुसार मराठी मातृभाषाशी लोकसंख्या किती वाढली आहे. इतरांच्या मानाने टक्केवारीनुसार किती वाढली किंवा किती घटली आहे. इतर भाषिकांमध्ये मराठी संख्या किती आहे. ?शिक्षणाच्या बाबतीत मराठी अथवा मराठी माध्यमातून शिकणार याची संख्या गेल्या पन्नास वर्षात किती वाढली मराठी माध्यमाच्या शाळा किती वाढल्या संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजांच्या संस्कृतीला स्वीकारत आहे आणि मराठी भाषेला नाक मुरडत आहे.

आपली महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. संतांनी मराठी भाषेचा उपयोग वाढवून मराठी साहित्य रचले खरे, ते सामान्य लोकांना समजावे याकरिता मराठी भाषेला काही प्रमाणात महासत्ता प्राप्त झाली, ती परदेशात गेलेल्या लोकांमुळे, त्यांच्या कौतुकास्पद कार्यामुळे

"पिकते तिथे वित नाही" महाराष्ट्रात मराठी भाषेचे महत्व तितकं जाणवत नाही. आई समोर असताना आईचे महत्व का?पण परप्रांतात काही काळासाठी गेल्यावर परप्रांतीय भाषा कानावर पडू लागते, तेव्हा! आपली मातृभाषा ऐकण्यासाठी कान कासावीस होतात.

जशी नदी वाहताना वेगवेगळी वळणे घेते, तशी मराठी भाषा वेगवेगळया भागात नवीन रूप धारण करते पण मूळचा गाभा मात्र तोच... संत ज्ञानेश्वरांनी छातीठोकपणे सांगीतल्याप्रमाणे अमृताशी पैजा जिंकणारा गोड पवित्र आणि रसरशीत असा बदल्या मराठी मायबोलीस अनंत प्रणात!

माझा मराठीची बोलू कौतूके
परि अमृताशी पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके मेळविन



Scanned with OKEN Scanner

संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचे वर्णन करतांना म्हटले आहे, अमृतालाही जिंकणारी भाषा म्हणून उल्लेख केलेला आहे अमृतालाही पैजने जिंकणारी माझी मराठी मातृभाषा आहे. मराठी भाषा काल आणि आज यामध्ये भरपूर फरक पडलेला आहे. खरंच पैजेसी जिंकणारी माझी मराठी भाषा कशी काय एवढी मागे पडू शकते, आम्ही मराठी भाषेला आमची माय म्हणतो.

दर एका १२ कोसावर भाषा बदलते मराठी भाषेचे अनेक रुप आहेत. अहिराणी, वऱ्हाडी अशा कित्येक प्रादेशिक भाषा महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळतात. मराठी भाषा खरंच कौतुकास्पद आहे. लोक भाषेवर राजकारण करत आहे. लोकभाषा ही एक प्रकारची आपली आई—माय असते. मराठी भाषेचे नानाविध रुप आपण अनुभवत असतो तसेच मराठी भाषेला समृध्द केलेला आहे. परिवर्तन ही काळाची गरज आहे. आपली मातृभाषा सोडून इतर भाषेशी नाळ जोडणे हे नक्कीच चुकीचे असेल कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून ओळखला जातो.

महत्वाची गोष्ट म्हणजे आज आपणापैकी किती लोकांना मराठी भाषा आवडते हा खरच विचार करण्यांसारखा विषय आहे. मराठी लोकांना मराठी दिन माहिती नसतो, एवढेच काय, तर तो का आणि कुणाच्या जन्मदिवशी साजरा करतात हे सुध्दा माहित नसतं.

१ मे हा महाराष्ट्र दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्र भर साजरा करतात परंतू आज महाराष्ट्र राज्य दिनी भाषण मात्र आपणाला हिन्दी किंवा इंग्रजी मध्ये हवे असतात हे ही आपल्या महाराष्ट्राचे खरंच दुर्भाग्य आहे की भाषा हिन्दी आणि इंग्लीश मध्ये होतात. आपल्यालाही इंग्रजी हिन्दी मधून भाषण देतोय म्हणून कौतूक वाटतं परंतू इतर कुणालाही भाषा येणे हे शिक्षण किंवा माहिती हुशारीचे लक्षण नाही. ती एक भाषा आहे म्हणून पालकांनी का बरं इतर भाषेतून शिक्षणाचा आग्रह करावा. मराठी भाषा ही समृध्द भाषा आहे खरे! तर शिक्षणाची भाषा ही मातृभाषाच असावी, कारण ती समजण्यास सोपी असते. बालबुध्दीला आपली मातृभाषा बोलण्यांस अडचण जात नाही. मातृभाषेतून शिक्षण सहज सोपे असल्यामुळे ते समजण्यांस किंवा नवीन गोष्टी शिकण्यांस अडचण जात नाही.

इंग्रज आपला देश सोडून जातांना बोलले की, आम्ही देश सोडून जाऊ परंतू आमच्या भाषेचे तुम्ही सदैव गुलाम राहाल! कदाचित ही गोष्ट सत्य आहे आणि आजही आपल्यावर इंग्रजी भाषा राज्य करीत आहे. आपण आपल्या मातृभाषेत कितीही उत्तम वक्तृत्व केले तरी त्याला तेवढी दाद मिळणार नाही, परंतू तेच जर इंग्रजीतून वक्तृत्व केले लगेच वाहवा! यु—टयुब आणि प्रसार माध्यमांना जाते.

आजची मराठी भाषा अशीच झाली. मराठी आणि अर्धमराठी असले काही प्रकार पडायला वेळ लागणार नाही, म्हणूनच फॉन्ड आता मला मॅड करेल, कुठे?अमृतालाही पैसे वर जिंकणारे संत ज्ञानेश्वर तर कुठे?आजचे अर्धमराठीचे फॉन्ड मध्ये शब्द वापरणारे लोक.

असो, जोपर्यंत शिवाजी महाराज की जय म्हटल्यावर तोंडातून अचूक जय निघेल तोपर्यंत माझी मराठी जिवंत राहील भाषेवर राजकारण नको कारण ते म्हणतात ना.

घर असावे घरासारखे, नकोत नुसत्या भिंती
त्यात असावा प्रेम जिव्हाळा, नकोत नुसती नाती

घर हे असावे घरा सारखे तसेच आपली मातृभाषा ही बोलण्यातून, वागण्यातून दिसावी. दिखावे नकोत... राजकारण नकोत परिवर्तन ही काळाची गरत आहे. परंतू जपून ही आपली गरज आहे. काही झाले असले तरी मी म्हणेल.

आमच्या उरा उरात स्पंदते मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी

कु.दिव्या यशवंत बनसोडे
बी.ए.भाग— १

# हे कुठेतरी थांबायला हवं !...

आज आपल्या आजूबाजूला ज्या काही घटना घडताना दिसत आहे. त्यामध्ये एक मुलगी /स्त्री ही तिच्या जिवनात सुरक्षित आहे का?तिला स्वातंत्र आहे का?असे बरेच प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात. परंतु त्या प्रश्नांचे उत्तर हे आपल्याला सापडतात का?हा त्यातला सर्वात मोठा प्रश्न आहे.

समाजात वावरतांना मुलीला स्त्रीला बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. तिच्यावर होणारे अत्याचार, लैंगिक अत्याचार, छेडछाड थांबायला पाहिजे, जर मुलीचा गर्भ असेल तर तो पाडून टाकला जातो म्हणून कायद्याने त्यावर बंदी आली आहे. परंतू ज्या मुलीचा जन्म झाला ती कितपत सुरक्षित आहे. हे आपल्याला माहित नाही स्त्री–भृणहत्या टाळावी असे म्हणतात परंतू स्त्री वर होणारे अत्याचार कधी थांबणार आई वडीलांची लाडकी परी शाळेत जाताना, कॉलेजात जाताना सुरक्षित नसते मध्येच त्यांना अडवणारे टवाळया करणारे हिंसक मुले असतात आणि मग मुलीची छेड काढणे, तिला चिडवणे, तिचा पाठलाग करणे असे खूप प्रसंग मुलीच्या जीवनात येतात. ती सहनही करते. कारण तिला तिचा भविष्य घडवावयाच असतं आणि ती काही गोष्ट टाळते सुध्दा परंतू जेव्हा मुलीला हा त्रास सहन होत नाही तेव्हा ती आत्महत्या देखिल करते आणि जर तिने त्या खिड काढणाऱ्याला थांबवण्यांचा प्रयत्न केला तर ते तिचं शोषण करून तिला मारुन टाकतात. कुठे–कुठे तर मुलीची इज्जत जाईल म्हणून आई वडील मुलीचं लग्न लावून देतातआणि मग मुलीचे सगळे स्वप्न पाण्यांत तिलाही वाटते, आपण आपल्या आई वडीलांसाठी खूप शिकावं काहीतरी करावं परंतू त्यांना मध्येच अडवणारे नराधम बसलेलेच असतात परंतू जर अत्याचार करणाऱ्याला कडक शिक्षा झाली पाहिजे तर एक मुलगी ही आपले स्वप्न पूर्ण करु शकेल आणि सन्मानाने जगू शकेल.

रोज वर्तमानपत्राच पान उघडल टिव्हीवर न्युज लावली तर त्याच बातम्या एका पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाला अरे काय केल त्या लहान जिवा ना तिने कोणाला काय मागितल परंतू हे करण्याआधी अत्याचार करणाऱ्याला हृदय नसेल का तो का विचार करत नाही ही माझ्या मुलीसारखं, आई सारखी आहे आपण हे करायला नको, पण हे थांबायलाच पाहिजे.

जर कोर्टाने लवकर लवकर त्यांना फाशीची शिक्षा द्यायला हवी कारण जर त्यांना तसं सोडलं तर ते पून्हा हया गोष्टी करतील म्हणून त्यांना हीच शिक्षा योग्य आहे परंतू अत्याचार झालेल्या मुलीच्या पालकाने कोर्टात केस टाकली तर सात सात वर्षे त्यांना कोर्टाच्या चकरा माराव्या लागतात तर असं होता लवकर न्याय मिळाला पाहिजे ती कोणाची तरी आई बहिण पत्नी असते मग तिला तसंच सन्मान मिळायला हवा जर हया गोष्टीचा निकाल लवकर लागत नसेल तर मग त्याचा एन्काउंटर व्हायला हवं कारण मुळात नसेल तर खाण्यास तयार होणार नाहीत आणि मग पोलीसांना मुलीच्या सुरक्षिततेसाठी शाळेत लक्ष ठेवायला काम पडणार नाही आणि प्रत्येक मुलगी स्त्री ही सुरक्षित व सन्मानाने जगायला लागेल.

या गोष्टींना ना आळा घातला पाहिजे कोपर्डी प्रकरण महिला डॉक्टर प्रकरण आणि रोजच्या बातम्या तेच परंतू आता तरी हे बदलायला पाहिजे आणि हे कुठेतरी थांबायला हवं...

आई बाबा ची लाडकी परी मी

नको हात त्याच्या नको छेडछाड ही, मलाही वाटते आकाशात उडावे  
स्वप्न माझे मी पूर्ण करावे.  
नको लाडको चॉकलेटचा, जीव माझा हा लाख मोलाचा  
जपले मला बाबाने फुलासारखे, नको शोषून घेऊ भुंग्यासारखे  
नको तोडू कोवळया काळया, फुलेन मग श्वासाने मोकळया  
मलाही वाटते आकाशात उडावे, स्वप्नात स्वप्न माझे मी पूर्ण करावे.

कु.अंकिता माणिकराव खिराडे, बी.कॉम.भाग– २

# सुभाषचंद्र बोस

सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रेसर नेते होते हे नेताजी या नावाने ओळखले जातात दुसरे महायुध्द चालू असतांना इंग्रजाशी लढण्यासाठी त्यांनी जपानच्या मदतीने आझाद हिंद फौजेची स्थापना केली होती त्यांनी दिलेला जय हिन्द चा नारा हा आज भारताचा राष्ट्रीय नारा बनला आहे.

१९९४ मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधीनी नेताजींचा देशभक्त असा उल्लेख केला होता. नेताजींचा प्रभाव होता की, काही जाणकार असे मानतात फाळणीच्या वेळी नेताजी भारतात हजर असते तर देशाची फाळणी झालीच नसती असे मत गांधीजींचे सुध्दा होते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिसा मधील कटक शहरात झाला त्यांच्या वडीलांचे नांव जानकीनाथ आणि आईचे नांव प्रभावती होते वयाच्या पंधराव्या वर्ष नेताजी गुरुच्या शोधात हिमालयात गेले गुरुचा हा शोध असफल राहिला त्यानंतर स्वामी विवेकानंदाचे साहित्य वाचून नेताजी त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असतांना अन्यायाविरुध्द लढण्यासाठी त्यांची प्रवृत्ती दिसून येत असे, कोलकात्यातील प्रेसिडेंसी महाविद्यालयात इंग्रज प्राध्यापक ओटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत म्हणून नेताजींनी महाविद्यालयात संप पुकारला होता.

१९२२ साली इंग्लंडला जाऊन नेताजी भारतीय नागरीक परीक्षेत उत्तीर्ण झाले परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले. १९२२ साली दास बाबूंनी व सुभाष बाबूनी कॉंग्रेस अंतर्गत स्वराज्य पक्षांनी स्थापना केली कोलकत्ता महानगर पालिकेची निवडणूक स्वराज्य पक्षाने लढवून जिंकली स्वत: दासबाबू कोलकात्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाष बाबूंना महानगरपालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले सुभाष बाबूंनी आपल्या कार्यकाळात महानगरपालिकेची काम करण्यांची पध्दत बदलून टाकली. रस्त्यांची इंग्रजी नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली. स्वातंत्र्य लढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतीकारकांच्या कुटुंबियांना महापालिकेत नोकरी मिळवून दिली.

लवकरच सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले पंडीत जवाहरलाल नेहरुसह सुभाषबाबूंनी कॉंग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. २६ जानेवारी १९३१ च्या दिवशी कोलकत्यात सुभाषबाबू व ती रंगीत ध्वज फडकवत एका विराट मोर्चाचे नेतृत्व करीत होते. तेव्हा पोलीसांनी केलेल्या लाठी हल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरुंगात असतांना गांधीजींनी सर्व कैद्यांची सुटका करुन घेतली परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतीकारकांची सुटका करण्यांस इंग्रज सरकार ने नकार दिला. त्यांना फाशीची शिक्षा सुनावली क्रांतीकारकांनागांधीजींनी सोडवावे अशी सुभाष बाबूंची इच्छा होती. परंतु असे झाले नाही म्हणून सुभाष बाबू कॉंग्रेस व गांधीजींच्या कार्यावर फार नाराज झाले नेताजींना दोन वेळा राष्ट्रीय कॉंग्रेसचा अध्यक्ष निवडण्यांत आले. कॉंग्रेस पार्टी सोडल्यानंतर १९३९ मध्ये त्यांनी फॉरवर्ड ब्लॉक संघटनेची स्थापना केली.

१९२१ ते १९४१ या काळात नेताजींना विविध कारागृहामध्ये बंदी ठेवण्यांत आले. १९४१ मध्ये नेताजींना एक घटनेमध्ये नजर कैदेत ठेवण्यांत आले त्यांनी वेषांतर करुन तेथून स्वत:ची सुटका करुन घेतली आणि कोलकत्याहून ते गोमोहो पोहोचले तेथून ते पेशावरला पोहचले पुढे पेशावर ते काबुल हा प्रवास पायी दरी—डोंगरातून केला त्यानंतर पुढे पुन्हा वेशांतर करुन मास्को मार्गे जर्मनी पर्यंत प्रवास करत ते हिटलरला जाउन भेटले १९४३ मध्ये जेव्हा नेताजी बर्लिनमध्ये वास्तव्यास होते. तेव्हा त्यांनी आझाद हिंद रेडिओ आणि फ्री इंडीया सेंटरची स्थापना केली.

१९४३ मध्ये नेताजी जपानला पोहोचले व २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी सिंगापुरात आर्जी—हुकुमत—ए आझाद हिंद ची स्थापना केली नेताजींनी दिलेला जय हिन्द चा नारा हा आज भारताचा राष्ट्रीय नारा बनला आहे दुसऱ्या महायुध्दाच्या काळात आझाद हिंद फौजने जपानी लष्कराच्या सहयाने भारतावर आक्रमण केले व फौजांनी इंग्रजाकडून अंदमान आणि निकोबार बेट जिंकून घेतली नेताजींनी ह्या बेटांचे शहीद आणि स्वराज बेटे असे नामकरण केले. नेताजी सुभाष चद्रं बोस यांचा गांधीजींच्या अहिंसावादी लढ्याला विरोध होता कारण त्यांचे ठाम म्हणणे होते की, रक्त सांडल्या शिवाय स्वातंत्र मिळणे केवळ अशक्य आहे. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून मंचुरिया त्या दिशेने जात होते प्रवासादरम्यान ते बेपत्ता झाले ह्या दिवसानंतर ते कधी कुणाला दिसलेच नाही नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा मृत्यु हे आजवर न उलगडलेल कोण आहे भारत सरकार देखिल हे प्रकरण शांत ठेवतात

तुम मुझे खून दो मै तुम्हे आजादी दूंगा

असा नारा देत भारतीय स्वांतलढ्याला नवचैतन्य प्राप्त करुन देणाऱ्या नेताजी सुभाषचद्रं बोस यांना मनापासून सलाम.

अजय श्याम चव्हाण, बी.ए.भाग—२



Scanned with OKEN Scanner

# नितीन बानगुडे यांचे प्रोत्साहन

प्रा.नितीन बानगुडे पाटील यांनी अगदी चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले आहेत ते म्हणतात की, मला काय व्हायचं आहे मला बनायच आहे बस सूचत नाही दुसर काही रात्रदिवस तो ध्यास लागून राहतो तेव्हा यश मिळवण सोप नसतं यश मिळण सर्वात मोठी गोष्ट आहे. ते टप्पे खावे लागतात मंग भार सोसावा लागतो सहन कराव लागत तेव्हा यशाच्या पायरीवर बसता येणे सोप नाही हे आम्हाला बर वाटते हो समुद्राच्या नदीच्या पाण्यावर ते बदक फिरत असत शांत स्वरुप संथ आपल्याला वाटते काय सुखी माणूस आहे तो त्याला टेन्शन नाही कशाच निवांत पाण्यावर ते रम्यपणे विहरत असल जीवन पाहीजे होत. पण त्या बदकाची पाण्यावरची अवस्था अनुभवयाची असेल तर पाण्याखाली त्या बदकाच्या पायाची जीवघेणी धडपड चालू आहेत ना ते एकदा बघा मग कळेल पाण्याखाली एवढी धडपड करावी लागते तेव्हा सहज पाण्यावर स्वस्थपणा बाटयाला येणे सोप नाही हे सांसाव लागत त्या संघर्षाची कष्टाची किती तयारी आहे. आपण अपयशाची कितीत टोम्पे खाल्ले आहे. आपणांस जगात असला कुठलाच यशस्वी माणूस सापडतच नाही ज्याच्या वाटयाला अपयश आल नाही यशस्वी तोच ज्याने खूप दु:ख भोगले नव्याण्णव वेळा अपेशी ठरला.

एडीशन १०० व्या वेळी यशस्वी झाला मुलाखत घेणारा ने विचारल तुम्हाला वाटंत असेल विनाकारण नव्याण्णव वेळा प्रयोग केला पण नाही एडिशन म्हणाले नाही नव्याण्णव वेळा केला तेव्हा तर कळल शंभरव्या वेळी यशस्वी कसं व्हायचं

ते वास्को फक्त फुलपाखरावर सत्तर वर्ष संशोधन करत बसला मग ७० व्या वर्षी नोबेल पारितोषिक मिळाल त्याला ध्यास होता तो फक्त फुलपाखराचा फुलपाखरु बस दुसर तिही नाही उठता बसता बस फक्त फुलपाखरु आयुष्यात असं काही करा ना की ज्यामुळे तुमची ओळख निर्माण झाली पाहिजे अस हे किरकोळ नकाकरत बसू अजिबात नाही आणि तुमच्यात आहे सामर्थ्य क्षमता आहे. असते परमेश्वराने कोणाला बुध्दी जास्त दिली कुणाला कमी दिली असं घडतच नाही जो बुध्दीचा अधिक वापर करतो तो अधिक बुध्दीमान मग तुमच्याकडे आहे तर वापर का नाही करत गंजन जाउ नका मला तरी वापरुन वापरुन तलवार झिजली तर आधीच धारदार होते व ठेवून दिली तर गंजून जाते.

आपण उल्लेख केला हा देश तारुण्याच्या काठावर आहे साठ कोटी फक्त युवकांची संख्या आहे. या देशात किती ती धार आहे किती ताकत किती सामर्थ्य ही उर्जा फक्त योग्य दिशेला वळयायला हवी तिला तो आश्रय विषय दयायला हवा ती फक्त त्या दिशेला कार्यरत करायला हवी वाटेल ते करता येईल वाटेल ते ही सगळयात मोठी गोष्ट आहे. पण तो ध्यास ते ध्येय तस हव मी मुंगी बघितली ती मुंगी केवढीसी तिच डोक केवढूस तिच्या डोक्यातलामेंदू केवढासा पण तरी त्या मुंगीला बरोबर कळत कुठल्या गावातल्या कितव्या आळीतल्या कितव्या घरच्या कितव्या खोलीतल्या कितव्या कपाटावरच्या कितव्या नंबरच्या फळीवर कोणत्या डब्यात साखर ठेवली आहे. हे सांगव लागत नाही रस्ता दाखवा लागत नाही मुंगी कण भर असते पण बरोबर साखर फस्त करते ती मुंगी जर हे करत असेल तर आम्हाला काय सातत्य मुंगी कडून शिकाव व चिकाटी मुंगी कडून शिकावी समोरुन जर एखादा आला तर तो धडकणार नाही ते शिकाव तिच्याकडून शिस्त म्हणजे काय असत आयुष्यातील छोटी मुंगी ही बघा कधी कुणाला वाटते जात नाही कोणाच्या कुणाच्याअधी मध्यात जात नाही सातत्याने कार्यरत राहते ते यशाकडे पोहचत जाते आम्ही उगाच महानतेचा आदर्श डोळयापुढे उभा करतो पायाकडे फक्त बघाव पाण्याखाली मुंगी दिसेल जीवनाचं तत्वज्ञान तिच्या कडून कळेल सर्व सोपा आहे ते अगदी साध सोप फुलपाखराला माहित नाही जीवशास्त्रीय दृष्टया त्या फुलपाखराची रचनाच अशी आहे की फुलपाखरु उडूच शकत नाही हा नियमच त्याला माहित नाही जगात जिथे कुणीच पोहोचू शकत नव्हत तिथे तो पोचोचला आणि लोकांनी म्हटल अरे कस काय तो म्हणला तिथ कुणी पोहोचू शकत नाही हेच मला माहित

नव्हत फार माहिती करुन घेणे फार अडचणीत असत आणि आमची तरुण पिढी फार जिज्ञासू आहे फार चिकीत्सक आहे ती अडचण झाली सगळयात मोठे सगळया गोष्टीची बारक सारीक माहिती नकोच विषय संपला तिकड ही सगळयात मोठी शोकांतिका आहे तो आत्मविश्वास आपण करु शकतो हा आत्मविश्वास तुम्हाला पुढ डेपावत राहतो तो आत्मविश्वास भरपूर आहे आपल्या जवळ पण त्या आत्मविश्वासाला जी कृतीची जोड हवी ती फार महत्वाची आहे.

शाळेचा निकाल लागला की सावकार शिक्षणाकडे गेले मी प्रश्न विचारला गुरुजी दुसरा नंबर कोणाचा आला शिक्षक म्हणाले असं काय अरे पहिला नंबर कणाचा आला ते विचार विचारांना नाही पहिला नंबर माझा आला ते मला माहित आहे. दुसरा नंबर कोणाचा आला ते सांगा याला आत्मविश्वास म्हणतात जमेल कारे मला होईल कारे माझयाकडून तुला होणारच नाही पडू नको त्यात तू जमेल तो प्रकारच नाही आमच्याकडे तीही सगळयात मोठी अडचण आहे म्हणून मी सांगीतले जिथे कौतूकाची छाप पडते ना तिथ माणसं मोठी होतात कर रे मी आहे अस म्हणणारी माणंस लागतात ही मोठी गोष्ट आहे. आमची पोरं जबाबदारी पार पाडत नाही त्याच काय कारण आहे माहित आहे ते आपण ती पडू नाही शकलो तर काय पुढच्या प्रभावाला घेतात म्हणून माग खेचतात ही सगळयात मोठी अडचण आहे होउ दे ना काय व्हायच ते काय होते हा बेफिकीरपणा जर त्याच्या उरात असू दया बेधडकपणे निर्माण होउ दया हे देखिल असुदया वाटेल ते करायला तयार होतील जिजाउ ने शिवाजी महाराजाला जर महालातच राहा म्हणून सांगीतल असत तर सहयाद्रीच्या झाडावर ३६० गडकोट उभे राहिले नसते असू दया हो पूर्ण ताकदीने तेव्हा यशस्वी होतात भवितव्य खूप सुंदर घडेल त्यांच मोठ होईल त्याच अपेक्षा आमच्या संगळयांची आहे महत्वाची गोष्ट आहे ती बिल गेटस मायक्रोसाप्ट कंपनी काढली तेव्हा त्यांनी अवधी अशी मुलाखत दिली अवघ्या १०० लोकांच्या बळावरती मायक्रोसॉप्ट कंपनी मी स्थापन केली आणि ती जगातील सर्व उत्कृष्ठ कंपनी व मी जगातील सर्वोत्कृष्ठ व्यक्ती श्रीमंती झालो तो या शंभर जणापैकी ९९ भारतीय व मी शंभरावा होतो मग हे १०० भारतीय तरुणांनी डोक्याचा वापर करुन बिल गेट च्या डोक्यावर बसतो आम्हाला आमच्या डोक्याचा सामर्थ्य कळत नाही. किती शौकांतिक सांगा आमच्या पारांना तुम्ही तुझयात आहे आहेच चल ही सगळयात महत्वाची गोष्ट आहेअडचण काय झाली सांगू शिक्षणाचे महत्व असतं पण सर्वात महत्वाच शिक्षकाकडून शिकता येत नाही.

म्हणून नितीन बागुडे म्हणतात तरुणांना आभाळ घ्या कसं घडत हे त्याला कळू दया विवेकानंदाचा जागर आम्ही करतो मी घरात पाहूणे आले की लहान मुलांना तर विचारताच काय होणार पुढे तू पोरा लहान मुलाला काय कळत मी तो नरेंद्र भिंतीवरचे चित्र पाहून म्हणला मी ड्रायव्ही होणा दुसरे मायबाप असते तर म्हटले असजे बर आहे पोरा आमच्याच पोटी आला..... जर दुसरा समोर ठेवायची यासाठी म्हणायच नाही का डॉक्टर होणार, इंजिनिअर होणार, वकील होणार ड्रायव्ही होणार पुढे कधीच समोर सोडला नसतो पाहुण्यांचा समोर त्याला कोंडून ठेवला असता पण त्या नरेंद्रच्या आईने नरेंद्रच्या जवळ घेतल नि गालावर हात फिरवला आणि म्हणाली बाळा ड्रायव्हर हो आणि त्या भिंतीवरच्या चित्राकडे पाहूण म्हणाली त्या अर्जूनाला गीता सांगायच्या त्या कृष्णासारखा ड्रायव्हर हो बी.ए.झालेले स्वामी विवेकानंद याला आईने एम.ए. नाही व्हायच का सांगीतले आईने पण ड्रायव्हरची हो पण जगाच्या विचाराचं सार्थ करणारा ड्रायव्हर हो हा संदेश दिला आम्ही आमच्या पोरांना किती संदेश देतो हे सांगा.

कु.अंजली महादेव डोके

बी.कॉम.भाग— २



Scanned with OKEN Scanner

# प्रेम

घरात एक चालतीबोलती लक्ष्मी पाणी भरते आहे.
सरस्वती होउन मुलांना अभ्यास घेत आहे.
दुर्गा होउन संकटाशी सामना करते आहे.
कालीका चांडीका होउन घराचे रक्षण करते आहे
लक्ष्मी होउन कुटूबाला सांभाळते आहे.
तिची पूजा नको स्त्री म्हणून सन्मान व्हावा
दु:खाचा डोंगर कोसळला असो की सुखाचा वर्षाव होत असतो
मनाला चिंतेचे ग्रहण लागलेले असो की आठवणीचे तारे लुकलुकत असो
आठवते ती फक्त आई
आत्मा आणि इश्वर यांचा संगम म्हणजे आई
जगात असे एकच न्यायालय आहे की, जेथे सर्व गुन्हे माफ होतात ते म्हणजे आई
डोळे मिटून प्रेम करते ती प्रेयशी असते
डोळे मिटल्यासारखे करते ती मैत्रिण असते
डोळे वटारुन प्रेम करते ती पत्नी असते
टाणि डोळे मिळेल मिटेपर्यंत प्रेम करते ती आई असते
खर आई किती वेगळी असते.

देवाकडे काही मागायचे असेल तर नेहमी आईचे स्वप्न पूर्ण व्हावे हा आर्शीवाद मागावा तुम्हाला कधी काही मागायची गरज पडणार नाही.

बाबांचा मला कळलेला अर्थ बाबा म्हणजे अपरिमित कष्ठ करणारा शरीर बाबा म्हणजे अपरिमित काळजी करणार मन स्वत:च्या इच्छा आकांशा बाजूला ठेवून मुलांसाठी झटणारे अंतकरण आई—वडीलांसाठी कोणतीही गोष्ट सोडा परंतू कोणत्र्हाही गोष्टीसाठी आई—वडीलांना सोडू नका सचिन तेंडूलकरला मिळालेल्या भारतरत्न त्याने त्यांच्या आईला समर्पित केले सचिनचा तो गौरव फटाके वाजवून आणि जल्लोष करुन साजरा करणाऱ्या युवापिढीने त्याच्या उत्तुंग क्रिडा नैपुण्या प्रमाणेच या समायोजित उदात वागण्याचे ही अनुकरण करायला हवे मनुष्य कितीही मोठा झाला प्रसिध्द पावला यशस्वी झाला तरी आईवडीलांशी असलेले नाते निरंतर असते दोन पिढयाचावाद हा जनरेल गॅप म्हणून ओळखला जातो पण अतिशय वेगाने धावणाऱ्या आणि रोज प्रगतीची पावले पुढे टाकत रंग बदलणाऱ्या या जगात आजची त+ण पिढी आपल्या पालका बरोबर सुसंवाद करुन बसली आहे.

धीरज मुकुंदराव अंकुशकर
बी.कॉम.भाग— ३



Scanned with OKEN Scanner

# कर्तव्याने घडतो माणूस

आयुष्यात सर्वांनाच हव असत परंतू यशाचे मनोहरी मंदिर इतक्या सहजासहजी गवसत नसतो त्यासाठी प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची जाणीव असली पाहिजे आपले आपल्या प्रती आपल्या कुटुंबाप्रती समाजाप्रती काय कर्तव्य आहे हे ओळखल्याशिवाय मनमुष्य आपले ध्येे निश्चित करु शकत नाही आणि केवळ कर्तव्याची ओळख असून चालत नाही तर त्यासाठी सकारात्मक विचारसरणी उदिष्टे संयम प्रशिक्षण कठोर परिश्रम कायमस्वरुपी आवड आणि प्रबळ इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. आपले कर्तव्य चांगल्या रीतीने पार पाडण्यासाठी त्या व्यक्तीला जे ध्येय निश्चित केलेले असले त्याबद्दल माहिती चा भक्कम पाया असणे सुध्दा आवश्यक आहे तरच ती व्यक्ती पूर्णपणे चांगल्या प्रकारे यशस्वीरित्या पार पडू शकते.

कर्तव्य मनुष्याला अतिशय क्रियाशिल बनवतात कर्तव्याची जाण असलेला मनुष्य समाजात स्वत: अस स्थान दर्जा मिळतो.

जीवनाच्या शर्यतीत सर्वांनाच निमंत्रण असते परंतू थोडया ची निवड होते की कारण आपण आपले कर्तव्यच ओळखले नाही आणि बोळखले तरी आपण आपल भविष्यासाठी आपल्या वर्तमानातील गरजांना सुखाचा त्याग करण्याचे धाडस करु शकत नाही आपल्या भारताला मिळवून देण्यासाठी ज्या विरांनी आपले प्राण दिले ते महान आहेत ज्या भारत भूमीत त्यांनी जन्म घेतला तिच्याबदल आपले कर्तव्य ओळखून ज्या लोकांमध्ये त्यांचा जन्म झाला त्यांचा उध्दार करण्यांच्या आपल्या कर्तव्यात ते रत आहेत ते धन्य होते गुलामगिरी वरील मोहिम पुढे रेटण्यासाठी तन—मन—धन आणि प्रफुल्लित तारुण्य कुर्बान करण्यांची शपथ घेतात ते धन्य होत भारतीय लोकांना त्यांची माणूसकी त्यांच स्वांतत्र पूर्णपणे मिळेपर्यंत जे चांगल्या वाईट सुखाची दुखाची संकटाची वादळाची मनाची अपमानाची पर्वा न करतो एक सारखे झटत राहीले ते लोक धन्य होत. असे म्हटल्या जाते की, कर्तव्या शिवाय मनुष्य घडत नाही आणि कर्तव्य जगण्यासाठी शिक्षणाची अत्यंत बरज आहे शिक्षणाची परिनिती चरित्रात होते शिक्षणाशिवाय मानवाचा खऱ्या अर्थाने उदार होत नाही केवळ विद्याप्राप्तीने मनुष्य श्रेष्ठ बनत नाही परंतू विद्देशिवाय व्यक्तीची प्रगती होणे आशक्य आहे व्यक्ती महान व कर्तव्यनिष्ठ बनण्यासाठी विद्या बरोबर चारित्र्यवा नही असले पाहिजे सुशिक्षीत व उच्च विद्या विभूषित लोकांच्या ठिकाणी शिक्षणाचा वाईट उपयोग घेण्यांचे सुध्दा शास्त्रीय असते असे लोक समाजाप्रती आपले कर्तव्य तर जाणवतच नाही उलट समाजाला खऱ्याचे खोटे व खोटयांचे खरे करुन लुबाडण्यांचा फसविण्याचा प्रयत्न करीत असतात अशा लबाडी करणाऱ्या लोकाना सुध्दा बुध्दी लागते म्हणून बुध्दी व चातुर्याला जर सदाचाराची जोड मिळाली तर तो खऱ्या अर्थाने सुशिक्षीत होईल.

शिक्षण हे सर्व दुखण्यावर रामबान उपाय आहे म्हणून शिक्षणाशिवाय मनुष्याला आपल्या कर्तव्याची जाणीव होणार नाही मनुष्याने स्वत:ला दुसऱ्याच्या निकषावर दुसऱ्याच्या मानधनावर मोजणे आणि दुसऱ्याच्या नजरेत सिध्द करण्यांचा प्रयत्न करणे हा एक अंतहीन विफल प्रवास आहे आपणच स्वत:ला स्वत:च्या नजरेत मोजायच असत आपणच आपली कर्तव्य ओळखायची असतात त्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहण्यांची गरज नाही हा प्रवासही अंतहीन आहे पण विफल नाही अशा प्रकारे प्रवास करणाऱ्याला त्याचे फळ जरुन मिळाल्याशिवाय राहत नाही जोपर्यंत आपल्या मनात पतनाचे विचार नाही येउ शकत कर्तव्य माणसाचे मोठेपण त्याची किर्ती घडवत असतो आपल्या भारत देशात असे कित्येक वीर पुरुष होउन गेले अनेक महान संत होउन गेले की ज्यांना त्यांच्या कर्तव्यामुळेच देवपण प्राप्त झाले आहे आणि त्यांची किर्ती जगभर अमर झाली आहे आज सर्व लोक त्यांची पूजा करतात ते केवळ त्यांच्या कर्तव्यामुळेच माणूस घडतो हे विधान आपल्या देशातील अनेक लोकांनी सिध्द करुन दाखविले आहे. त्यांनी इतकी महान कर्तव्य केली आहेत की, त्यांच्या कर्तव्यामुळे त्यांना तर देवपण प्राप्त झाले आहे. आपल्या देशाची परंपरा अतिशय महान आहे जगभर प्रसिध्द आहे आणि आपली अशी महान परंपरा जगभर पोहोचविण्यांचे आणि पुढच्या पीढीला आपल्या संस्कृतीची माहिती देण्यांचे काम संतांनी पार पाडले आहे. त्यांच्या या महान कर्तव्यामुळेच भारताची परंपरा जगभर प्रसिध्द झाली आहे. ऐवढेच नाही तर आपल्या देशातील स्त्रीयांनी सुध्दा आपली आपल्या कुटुंबाप्रती असलेली कर्तव्य पार पाडण्यांत कोणत्याही प्रकारची कमी केले नाही सावित्रीबाई फुले यांनी अनेक हाल अपेष्टा सहन करुन आत्मविश्वासाने स्त्री शिक्षणाचे महान कार्य पार पाडले आहे आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी दिवितीय कामगिरी



Scanned with OKEN Scanner

केली आहे ती केवळ सावित्रीबाई फुले यांच्या पुण्याइने त्याचप्रमाणे राणी लक्ष्मीबाई देशासाठी आपली कर्तव्यपूर्ती म्हणून लढता लढता आपल्या प्राणाची आहुती दिली आपल्या देशातील काही लोकांच्या कर्तव्यदक्षतेमुळे भारत देश दिडशे वर्षाच्या पराकियांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला कधी कधी असे वाटते की निसर्गाने प्रत्येक मनुष्याला जन्मच कर्तव्यपूर्तीसाठी दिला मनुष्याच्या निर्मिती मागचा उदेशच मुळात त्याने चांगल्या कर्तव्यात आपल्या स्वत:चे जीवन समृध्द व दुसऱ्याचे जिवन दु:ख दूर करावे आणि देश किंवा संपूर्ण सृष्टी बनवावी अशी अपेक्षा जणू परमेश्वराने मनुष्य कडून केलेली आहे म्हणूनच मनुष्याच्या जन्मापासून तर मृत्युपर्यंत अनेक अशी कर्तव्य मनुष्याशी जोडलेली असतात मनुष्याने ती फक्त ओळखली पाहिजे कर्तव्यदक्ष मनुष्यच शून्यातून विश्व निर्माण करु शकतो याचे मूर्तीमंत्र उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होत छत्रपती शिवाजी महाराजाच्या कर्तव्यदक्ष त्यामुळेच व महत्वाकांक्षी व्यक्तीमुळेच शुन्यातून एक महान हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि त्यांच्या महत्वकांक्षी ला जोड होती त्यांच्या प्रबळ आत्मविश्वाची आणि या आत्मविश्वासाच्या जोरावरच छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत कमी वयात हिंदवी स्वराज्याची निर्मितीची शपथ घेतली होती.

आज कर्तव्याची जाणीव होण्यासाठी गरज आहे योग्य शिक्षणाची परंतू आता ज्या चमत्कारीक शिक्षण पध्दतीमुळे जीवनाचे दोन तुकडे पडतात ती म्हणजे अशी की आयुष्याची पहिली पंचवीस वर्ष नमुष्याने जगण्याच्या भानगडीत न पडता नुसते शिक्षण घ्यावे आणि नंतर शिक्षण गुंडाळून ठेवून कर्तव्य म्हणून मरेपर्यंत जगावे अशी ही जगण्यांची व कर्तव्य पूर्तीची रीत निसर्ग योजनेच्या अगदी पूर्णपणे विरुध्द आहे आयुष्याच्या अमुक एका वर्षाच्या अगदी अखेरच्या दिवसापर्यंत मनुष्याने जीवनाविषयी संपूर्ण बेजबाबदार राहिले तरी चालेले नव्हे बेजबाबदार राहीले पाहिजे आणि पुढच्या पहिल्या दिवसी उजाडले की गलेच संपूर्ण जबाबदारी उचलण्यांस सज्ज झाले पाहिजे अशा प्रकारे जर संपूर्ण बेजबाबदारीतून संपूर्ण जबाबदारी उडी मारण्यांच्या प्रयत्नात हात पाय तुटले तरी चालेल अशाप्रकारे त्या व्यक्तीचे कर्तव्य यावर लादले जाते अशी आताच्या शिक्षण पध्दतीची योजना आहे अशाप्रकारे एखादा व्यक्तीवर कर्तव्य सोपविल्या गेले असेल तर स्वत:चे उज्जवल भविष्य घडविणे तर दूरच राहिले तो कर्तव्य पार पाडताना हाताश होउन जाईल अशा प्रकारचे जर कर्तव्य लादले तर त्याने जीवनाची नाही तर मरनाची तयारी होते.

कर्तव्याची पूर्तता करणे म्हणजेच काही अगदी मरण नाही वास्तविक मनुष्याने जीवन आणि मरण दोन्ही आनंदाच्या गोष्टी समजल्या पाहिजे कारण आजचे मरण उदयावर ढकलता ढकलता एक दिवस असा उगवतो की त्यादिवशी करावेत लागते कर्तव्याच्या बाबतीतही असेच आहे जो कर्तव्याला मुकला तो जीवनच गमावून बसतो म्हणून लहान मुलांना लहापनणापासूनच योग्य संस्कार शिक्षण व हळूहळू कर्तव्याची जाण करुन दिली पाहिजे त्यामुळे जेव्हा त्यांच्यावर जबाबदारी पडेल तेव्हा तो घाबरणार नाही लट आत्मविश्वासाने आपले कर्तव्य पार पाडील शिक्षण हे कर्तव्याचे अनुषंगिक फळ आहे जो कर्तव्य करतो त्याला ते कळत नकळत मिळतो.

अशाप्रकारे आपले कर्तव्य ओळखून जो मनुष्य निस्वार्थपणे आनंदाने आपले कर्तव्य पार पडतो त्याचे नाव त्याचा जन्म किर्ती रुपाने अमर राहतो कर्तव्यमुळेच साध्या व्यक्तीला सुध्दा देवपण प्राप्त होते म्हणून प्रत्येक मनुष्य त्यांच्या चांगल्या कर्तव्यमुळेच घडत असतो.

रवि उदयसिंग राठोड

बी.ए.भाग-- ३



Scanned with OKEN Scanner

# प्रेम कुणावर करावे?

प्रेम कुणावर करावे?
जो आपल्याला आवडतो त्याच्यावर
की ज्याला आपण आवडतो त्याच्यावर
प्रेम कोणावर करावे?
मन वेधून घेणाऱ्या गुलाबावर
कि त्याला जपणाऱ्या काट्यावर
प्रेम कुणावर करावे?
जन्म घेतलेल्या माय भूमी वर
की हिच्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या जवानावर
प्रेम कुणावर करावे?
सुंदर नाजूक वेलीवर
की त्याला आधार देणाऱ्या वृक्षावर
प्रेम कुणावर करावे?
रंगीबेरंगी दिसणाऱ्या फुलपाखरावर
की तिला बागडणाऱ्या वागण्याची चेतना देणाऱ्या वाऱ्यावर
तुम्हीच सांगा?
प्रेम कोणावर करावे?
परवा भेटलेल्या मुलीवर
ही आयुष्यभर आपल्या वरुन
जीव ओवाळून देणाऱ्या..... आई वडीलांवर

राजेश विनोद जाधव
बी.ए.भाग– २

## जीवनाचा प्रवास

राहिले र ! अजून श्वास किती
जिवना नाही तुझी मिजास किती?
आजची रात्र खिन्न ताऱ्यांची
आजचा चंद्रही उदास किती?
मी कसे थोपवू शब्द माझे
हिंडती सूर आरपास किती?
दु:ख माझे विरुगळे त्याचा
मी करावे खुळे कयास किती?
ओळखीचे कुणीतरी गेले
ओळखीचा इथे सुवास किती?
हे कसे प्रेम या कशा आशा
मी जपावे अजून श्वास किती
सोबतीला जरी मुझी छाया
मी करु पांगळा प्रवास किती?

कु.प्रतिक्षा प्रदिप राठोड
बी.ए.भाग– १

# संस्कृतीचे भक्त

इंग्रजी जास्त मराठी कमी अशी भाषा म्हणा
आईची जागा घेतली मम्मीने अन् बाबाचे झाले डॅडी
खेळ खेळतांना सुध्दा म्हणावे लागते आहे का रेडी
नमस्कार, राम—राम नको आता, हॅलो अन् हाय चा जमाना
शुभेच्छा— शुभकामना नको, बेस्टलक, कॉग्रॅट्स बोलताना,
वाढदिवसाचे औक्षण नाही आता बर्थडेच्या मेणबत्या विझवणे,
मधुर भावस्पर्शी संगीता ऐवजी पॉप म्युझिक, रॉक ॲण्ड रोल ने मन रिझवणे
सदासर्वकाळ माणूस असतो बिझी, कुणी बोलले तर घेत नाही इझी
आवडे फार राहण्यात सतत लेझी, मात्र सगळेच जपतात आपली क्रेझी
इंग्रजीचा वापर म्हणजे जणू, प्रतिष्ठेची कमाल अन् शिक्षणाचा तोरा
मराठी आमची मायबोली, त्याचे महात्मे जाणिले थोरा
परंतू आम्ही भग्न नाही त्या भाषा संस्कृतीचे भक्त
पश्चिमात्यांच्या अंधानुकरणातच धन्यता मानते फक्त

कु.दिव्या यशवंत बासोळे, बी.ए.भाग— १

---

# भ्रुणहत्या थांबवा मुलगी वाचवा...

अरे मानव ! ज्यात उमलला जीवन अंकुर आपला
बीजाच्या त्या आज बळी का घ्यावयास तु टपला
बालपणी कुसुमासम तुजला जिने ओजळीत जपला
आभाळी गडबडल्या बरती कुशीत जातू लपला
बीजाच्या त्या आज बळी का घ्यावयास तू टपला
तुझ्या काळजीने ज्या नयनी थेंब सुध्दा टपटपला
वेळप्रसंगी तुझ्या रक्षणा जी बनलेली चपला
बीजाच्या त्या आज बळी का घ्यावयास तु टपला
ज्या हृदयामधील मायेचा भाव कधी ना लपला
तुझ्यासाठी जीव सर्वदा जिचा भाबडा खपला
बीजाच्या त्या आज बळी का घ्यावयास तू टपला
खेळ जीवाचा तुझ्या सुकारणे जिच्याआटपला
जिने आजवर तुझ्या यशाचा जप जीवनी जपला
बीजाच्या त्या आज बळी का घ्यावयास तु टपला

कु.प्रिती प्रदिप राठोड, बी.कॉम.भाग— २



Scanned with OKEN Scanner

# अदृश्य बाबा

दिसत नाही ते जगात
पण दिसतात माझ्या मनात
आठवण करते मी त्यांना
माझ्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणात
फुलविले असते त्यांनी
माझे जग
जर असते ते माझे आधार
वाटते मला त्याच्याविना
जीवन हे निराधार
वाटते माझ्या मनाला
एक प्रश्न विचारावा देवाला
सुंदर सृष्टीतील शास्वत सौंदर्य
तू का नाही पाहून दिला
माझ्या बाबाला

कु.एच.आर.रणबावळे, वर्ग १२ वी कला

---

# कर्जबाजारी शेतकरी

साऱ्या जगाचा भार, खांद्यावर वाहून नेतो
पण साऱ्या जगाचा पोशिंदा
उपाशीच झोपी जातो
कधी कधी शेतकऱ्याला, निसर्ग साथ देत नाही
निसर्गाने साथ दिली तरी
त्याच्या पिकाला भाव येत नाही
असला जरी पंतप्रधान
तरी शेतकऱ्याला कसा विसरणार
नाही पिकविले शेतकऱ्यानेच
तर त्याच्या पोटाची, खळगी कोण भरणार
कर्मचाऱ्यांना करतो म्हणते, लागू सातवे वेतन आयोग
पण शेतकऱ्याच्या कर्जमाफीचा, काहीच येत नाही योग
कर्जाचा डोंगर कसा फेडावा हेच कळत नाही.
शेवटी बिचाऱ्या शेतकऱ्याला
आत्महत्या केल्याशिवाय
पर्यायच उरत नाही.

कु.एच.आर.रणबावळे, वर्ग १२ वी कला



Scanned with OKEN Scanner

## मी मुलगी

मी मुलगी...
मायेची ऊब, लक्ष्मीचे रुप, साईचे तूप जिवलग ही खूप...
मी मुलगी....
आईची तान्ही बाबा ची राणी... मंजूळ गाणी, पतीची अर्धांगिनी
मी मुलगी....
बाबा ची शान, आईचा प्राण, दादा ची आन घराचा मान
मी मुलगी...
देवी आल्याने मी, माँ जिजाऊ मी
सावित्रीबाई मी, झाशीची राणी मी
मी मुलगी...
तरीही हुंड्यासाठी चढणारी बळी...
फुलण्याआधीच कुस्करणारी कळी... कोणालाही नको मुळीच...
मी मुलगी... मी मुलगी...

कु.सपना प्रकाश शृंगारे, बी.ए.भाग– २

---

## माझे शिक्षक

आज वाटलं मला
थोड शिक्षकावर लिहाव
जमत की नाही त्यांना
शब्दात मांडण हेच पहावं.
आयुष्यभर केले शिक्षकांनी
विद्यार्थ्यासाठी कष्ट
सहजासहजी मिळाली नाही
विद्यार्थ्यांना कोणतीच गोष्ट
महाविद्यालयातील सर्वावर
आहे त्यांची फार माया
महाविद्यालयातील प्रत्येकावर
त्यांनी धरली शिक्षणाची छाया
त्यांना आयुष्यातील प्रत्येक
संकटावर सहज उत्तर सूचल
आजच्या युगात ही त्यांनी
आपल्या विद्यार्थ्यांना एकत्र जपलं
आज त्यांच्यावर लिहीतांना
होत आहे हर्ष फार
असे आमचे शिक्षक
आहेत आमच्यासाठी आदर्श फार

कु.भाग्यश्री हरीओम लुंगे, बी.ए.भाग– २

# माझे महाविद्यालय

माझ्या महाविद्यालयात भेटते अनमोल ज्ञान, घेऊन या शिक्षा होतील सर्व विद्वान
या अनमोल महाविद्यालयात भेटते असे ज्ञान, जाईल जगापुढे होतील सर्व महान
माझ्या महाविद्यालयात भेटते अनमोल ज्ञान.
होती अनपड माणसे जेव्हा नव्हते शिक्षण, आता आलेय शिक्षण झाले जग सक्षम
असे वाटत होते की कधी पुढे जाऊ आपण, भारताची छाती कधी उंचावर नेऊ आपण
माझ्या महाविद्यालयात भेटते अनमोल ज्ञान
सावित्रीबाईनी दिले मुलीला शिक्षण, आज मुली झालेल्या जगात महान
या शिक्षकांनी दिले मुलीला सन्मान, आज गाजते या सावित्रीचे गुणदान
माझ्या महाविद्यालयात भेटते अनमोल ज्ञान
या शिक्षणानी केल्या सर्व अडचणी दूर, मुले घेऊन या शिक्षण चालली उंचावर
सर्व अडचणी होतील दूर जवा पसरेल ज्ञान्या शिक्षण आणि दिलेले सर्वांना सन्मान
माझ्या महाविद्यालयात भेटते अनमोल ज्ञान, घेऊन या शिक्षा होतील सर्व विद्वान
माझ्या महाविद्यालयात भेटते अनमोल ज्ञान, घेऊन या शिक्षा होतील सर्व विद्वान

अंजली साहेबराव भोयर, वर्ग ११ वा वाणिज्य

---

# पैसा

प्रस्तावना

पैशाचा शोध हा अत्यंत महत्वचा मानला जातो मानवी समाजाच्या प्रगतीबरोबर पैशाची देखील उत्क्रांती झाली मानवी गरजा भागविण्यासाठी विविध वस्तू व सेवांचा उपभोग घेतला जातो आज हया वस्तू व सेवांची खरेदी व विक्री अत्यंत सुलभ पणे मयाने माध्यम व सार्वत्रिक शिकार येत असलेल्या पैशाच्या सहयाने केले जाते. पैशाचा उगम होण्यापूर्वी वस्तूविनिमय पध्दतीत वस्तूविनिमय म्हणजे एखाद्या वस्तूच्या मोबदल्यात दुसरी वस्तू किंवा सेवा मिळविणे तांदूळ च्या बदल्यात कापड दुध इत्यादी कालांतराने या पध्दती अनेक अडचणी आल्या त्या अडचणी दूर करण्यांसाठी काही बसतात पैसा म्हणून स्वीकार करण्यांत आला उदाहरणात पशुपक्षी पैसा धातू पैसा कागदी पैसा पतपैसा प्लास्टिक पैसा अशा निरनिराळया टप्यापासून पैशाची उत्क्रांती झाली.

वस्तूविनिमय यातील अडचणी गरजांचा दुहेरी संयोग म्हणजे परस्परांत जवळील वस्तूची आवश्यकता असणे आणि त्यावर स्वीकारण्यांची तयारी असणे. गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभावी वस्तूविनिमय पध्दतीतील एक महत्वाची मर्यादा होती.

मूल्याचा सामाईक मापदंड किंवा हिशेबाचे साधन अस्तित्वात नसल्याने विनिमय केलेल्या वस्तूचे मूल्य ठरविणे अवघड होते या वस्तूची तुलना करता येत नाही अशा वस्तूचा विनिमय करणे अवघड होते.

भविष्यकाळात उपभोगासाठी वस्तूच्या साठी करून ठेवणे वस्तूविनिमय यामध्ये आवश्यक होते उदाहरणात दूध मासे अंडी भाजीपाला या सारख्या नाशवंत वस्तू साठवून अवघड होते. विलंबित देणे म्हणजे भविष्यकाळात यावयाची देणी होय जेव्हा लोक घरकुलांच्या रुपात कर्ज घेत असत तेव्हा त्यात शारीरीक स्थिती मध्ये काही वर्षानंतर तीन गौरे परत करणे अवघड होते. वस्तूविनिमय पध्दतीत अविभाज्य वस्तूचा विनिमय करतांना लहान भागांमध्ये देणी देणे अवघड होते उदाहरणार्थ व्यक्तीकडे तांदळाचे पोते होते त्याचा विनिमय व्यक्ती जवळील नांगरा बरोबर करावयाचा होता परंतू समजा व्यक्तीला तांदळाचे अर्धेच होते हवे असल्यास अर्धा नांगर त्याबदल्यात देणे अडचणीचे होते.

व्याख्या

१) प्रा.एफ.ए.वाकर : पैशाची जो पैशाची कार्य करतो तो पैसा होय
२) डी.एच.सेबर्टसन : व्यावसायिक देण्यांच्या बाबतीत अथवा वस्तूच्या मोबदल्यात वस्तू प्रमाणावर स्वीकारली जाणारी कोणतीही वस्तू म्हणजे पैसा



Scanned with OKEN Scanner

३) प्रा. क्राउथर यांच्या मते : जी वस्तू विनिमय माध्यम म्हणून सर्वसाधारणपणे स्विकारी असते आणि त्याचबरोबर जी मूल्यमापन म्हणून नाचे कार्यकर्ते अशी कोणती वस्तू म्हणजे पैसा होईल

पैशाची उत्क्रांती आणि पैशाचे प्रकार

उत्क्रांती :—

वस्तूविनिमय खातील विविध अडचणी अशा एका व्यवस्थेचा विकास घडवून आणला जेथे सर्वसामान्य स्वीकृती असलेली वस्तू विनिमय माध्यम म्हणून कार्य करु लागली नागरीकरणाच्या प्रारंभीच्या काळात प्राण्यांच्या रुपात पैसा अस्तित्वात आला उदाहरणात गायी मेंढया शेळया पाळीव प्राणी त्यानंतर वस्तूपेक्षा पैसा वापरला गेला वस्तू पैसा वापरण्यासाठी वापराण्यातील अडचणीमुळे धातू पैशाचा उगम झाला धातू पैशाच्या मर्यादांमुळे कागदी चलनाचा उगम झाला आधुनिकीकरणामुळे बँक पैसा व प्लास्टिक पैशाचा उगम झाला पैशाच्या उत्क्रांतीचा विविध व्यवस्थेनुसार पैशाचे पुढील प्रकार सांगता येतात.

पैशाचे प्रकार :—

मानवी विकासाच्या प्राथमिक अवस्थेत देवान घेऊनच माध्यम म्हणून पक्ष पैसा वापरला होता उघानात गाई शळया मेंढया इत्यादी जुन्या काळात शंकर शिंपले रंगीत दगड हस्तिदंत प्राण्यांची कातडी मीठ धान्य व दुर्मिळ वस्तूंचा वापर पैसा म्हणून केला.

सोने चांदी तांबे ब्रांच निकेल इत्यादी प्रकारच्या धातूपासून तयार करण्यांत अलेल्या नाण्यांना धातू पैसा असे म्हणतात धातूच्या तुकडयाचा आकार व शुध्दता सरकार ठरवून देत असते त्यांनाच नाही म्हणतात

ज्या नाण्याचे दर्शनी मूल्य व अंगी मूल्य समान असते त्त्याच प्रमाणात नाणी म्हणतात दर्शनी मूल्य नाण्यांचे विनिमय मूल्य दर्शविते अंगीभूत मूल्य म्हणजे नाणे ला धातूचे बनलेले असते त्यांचे मूल्य यानाने सोने चांदी या धातूपासून बनवितात.

ज्या नाण्यांचे दर्शनी मूल्य अंगावर मूल्यापेक्षा अधिक असते त्यास गवळण आणि म्हणतात ही नाणी ॲल्युमिनियम निकेल धातू पासून बनवलेली असतात भारताच्या चलनातील सर्वांनी गौण आणि आहेत.

कागदी पैसा कागदी पैसा ही पैशाला पर्याय आहे कागदी पैशामध्ये मध्यवर्ती बँका व सरकार निर्गमित केलेल्या नोटांचा समावेश होतो.भारतात सरकार कडून इतर सर्व चलनी नोटा यांचा वापर आपण मध्यवर्ती बँकाकडून भारताचे रिझर्व बँक छापल्या जातात धातूंचा नाना पेक्षा कागदी नोटा वजनाने हलके असल्यामुळे हस्तांतरण साठवणूक मूल्यमापन सहज करता येते.

पतपैसा म्हणजे लोकांनी बँकाकडे ठेवलेल्या ठेवी ज्या केव्हाही काढता येतात किंवा त्यांचे दुसऱ्या व्यक्तीकडे धनादेशाचे त्या साहाय्याने हस्तांतरण करता येते हा धनादेश पहिल्यासारखे कार्य करतो परंतू धनादेश म्हणजे पैसा नव्हे तर ठेवी हस्तांतरणा करण्यासाठी पत्र साधना हे आधुनिक जगात प्रगत तंत्रज्ञान धनादेशाच्या व्यवहाराची जागा संगणकीय यंत्रणा ने घेतली आहे डेबीट कार्ड क्रेडिट कार्डचा मोठया प्रमाणावर वापर केला जातो परंतू त्याचा त्यांना सार्वत्रिक मान्यता नसते प्लास्टिक पैशाचा वापर मध्ये बँक खात्याचा माध्यमातून ग्राहकांमध्ये हस्तांतरीत होतो त्यामध्ये प्लास्टिक करण्यांचे हस्तांतरण होत नाही तर बँकेतील शिल्लक हस्तांतरित होते. इलेक्ट्रॉनिक वॉलेट इलेक्ट्रॉनिक करण्यांचा तो एक प्रकार असून संगणक किंवा स्मार्टफोनने ऑनलाईन व्यवहार करण्यांसाठी ते वापरले जाते क्रेडीट कार्ड डेबिट काढण्यासारखेची बुलेट असाही उपयोग आहे युवा नेट बँक खातेदारांना खात्याशी जोडावे लागते आणि त्या नंतर खात्यावरुन पैसे चुकते करतात.

चांगल्या पैशाचा गुणधर्म

सार्वत्रिक स्वीकार्यता :—

१) ताजी वस्तू पैसा म्हणून कार्यकर्ते ती वस्तू सर्वांनी पिण्यांसाठी वापरले पाहिजे.

२) मूल्य स्थिरता : त्याचे मूल्य साधारणपणे स्थिर असले पाहिजे.

३) एकजिनसीपणा :— एकाच मूल्याच्या पैशांमध्ये आकार दर्जा वर आधारीत एकजिनसीपणा असावा

४) टिकाऊपणा :— ती वस्तू दिर्घकाळासाठी टिकवली पाहिजे धातूची नाणी नोटा पेक्षा जास्त टिकतात.

५) विभाज्यता :— पैसा म्हणून वापरल्या जाणाऱ्या वस्तू चे पाच रुपये दहा रुपये १५ रुपये इत्यादी लहान लहान मुले वर्गात विभाजन करता आले पाहिजे.

कु.अंजली साहेबराव भोयर, वर्ग ११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

# वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यासाठी सी.ए.कायचय?

चार्टर्ड अकाउंटंट होण ते स्टेटस मिळवण लोकांचे हिशोब चोख ठेवणे आणि रगड पैसा कमावण हे बहुतेक विद्यार्थ्यांचे स्वप्न असत अर्थात यात काही गैर नाहीच पण सी.ए.करण्यापूर्वी या कोर्समधील समज गैरसमजाविषयी माहिती घेण गरजेचं आहे. सी.ए. चा अभ्यासक्रम हा वाटतो तेवढा सोपा निश्चितच नसतो. संपूर्ण खोलवर जाऊन एखादया विषयाची व्याप्ती समजावून घेण त्याची खोली पाहण. यासाठी प्रचंड अभ्यासाची आवश्यकता असते सी.ए.सारख्या करिअरची सुरुवात बारावी कॉमर्सनंतर लगेचच करता येऊ शकते. कॉमन प्रोफिशियन्सी टेस्ट (सीपीटी) उत्तीर्ण होण त्यासाठी आवश्यक आहे. बारावी कॉमर्सनंतर सीपीटी उत्तीर्ण होवून पुढे आयपीसीसीसाठी प्रवेश मिळवता येऊ शकतो आयपीसीसी म्हणजे इंटिग्रेटेड प्रोफेशनल कॉम्पिटन्सी कोर्स! सी.ए. होण्यासाठीची पहिली पायरी म्हणायला हवी बेसीक अकाउंटस मर्कंटाईल लॉ ,इकॉनॉमिक्स टॅक्सेशन सारख्या विषयाचा मुलभूत परंतू व्यापक अभ्यास होतो.

कॉस्ट अकाउंटन्सी (सी.डब्ल्यु.ए) आणि कंपनी सेक्रेटरी (सी.ए) विद्यार्थीसुध्दा सी.ए.चा अभ्यासक्रम करु शकतात मात्र त्याच्यासाठी आठ महिन्याचे स्टडी कोर्स पूर्ण करावाच लागतो त्यानंतर मात्र ते पहिल्यांदा आय. पी.सी.सी.साठी पात्र ठरु शकतात सी.ए.चा अभ्यासक्रम हा केवळ पुस्तकीच नाहीये तर प्रात्यक्षिके किंवा प्रत्यक्ष ट्रेनिंगचा देखिल इथे अंतर्भाव असतो बदलणाऱ्या काळा प्रमाणे अद्ययावत गोष्टीचे ज्ञान मिळण्यासाठी सी.ए.इन्स्टिटयुटने फार दुरदृष्टीकोन ठेवून कोर्स मध्ये काही कडक बदल आणि नियम केलेले आहे. शंभर तासांचा आय.टी. ट्रेनिंग (इन्फर्मेशन टेक्नॉजी) तसेच पस्तीस तासांचा ओरिएंटेशन प्रोग्राम हा अत्यावश्यकच आहे. दोन्ही ट्रेनिंग प्रोग्राम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी प्रॅक्टिकल ट्रेनिंगसाठी पात्र ठरु शकतात आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंग सुरु करण्यांसाठीच आणखी एक अट म्हणजे आयपीसीसीचे दोन्ही किंवा पहिला ग्रुप पास होण केवळ दुसरा ग्रुप पास होऊन चालत नाही हे मात्र लक्षात ठेवायला हवं.

कॉमर्समधून ज्या विद्यार्थ्यांनी बॅचलर्स किंवा मास्टर्स पूर्ण केलेल आहे. असे विद्यार्थी देखिल सी.ए.साठी निश्चितपणे प्रवेश घेऊ शकतात. फक्त इथे दोन महत्वाच्या अटी असतात एक म्हणजे बॅचलर्स किंवा मास्टर्स हे कॉमर्समधून कमीत कमी पंचावन टक्कयाहून अधिक गुणांनी झालेल असाव आणि अकाउंटस लॉ, इकॉनॉमिक्स , ऑडिट , फायनान्शियल मॅनेजमेंट टॅक्सेशन अशा पैकी कोणतऱ्याही तीन विषयाचे शंभर मार्कांचे पेपर्स असायला हवेत. युजीसी. प्रमाणित विद्यापीठ तसेच दुरस्थ शिक्षण विभागाकडून मिळवलेले प्रमाणपत्र सुध्दा ग्राहय धरले जाऊ शकते. कॉमर्स व्यतिरिक्त अन्य शाखांमधून ज्या विद्यार्थ्यांनी बॅचलर्स किंवा मास्टर्स केलेले आहे अशा विद्यार्थ्यासाठी गुणांची अट ही कमीम कमी साठी टक्के आहे. असे पात्र कॉमर्स किंवा अन्य शाखेचे विद्यार्थी थेट आय.पी.सी.साठी रजिस्ट्रेशन करु शकतात तसेच शंभर तासांचे आय.टी.ट्रेनिंग व पस्तीस तासाचा ओरिएंटेशन प्रोग्रामसुध्दा पूर्ण करु शकतात.

आठ महिन्यानंतर च्या स्टडी कोर्सनंतर हे विद्यार्थी तीन वर्षाच्या प्रॅक्टिकल ट्रेनिंगसाठी पात्र ठरु शकतात. वरकरणी ही कोर्स खुप कमी खर्चाचा किंवा सोपा वाटला तरी तसं नाहिये इथ संपूर्ण भारतातील निकाल हा अवघा तीन ते सात टक्क्यांचा असतो म्हणजे केवळ इतके टक्के विद्यार्थीच पास होतात शिवाय तीन वर्षाच्या प्रॅक्टिकल ट्रेनिंग काळात तुम्हाला अत्यल्प स्टायपेंड (विद्यावेतन) दिल जाते त्यातून जेमतेम प्रवास खर्च निघू शकतो तेव्हा हा तीन वर्षाचा आर्थिक तोटाही सहन करावा लागतो शिवाय टॅक्सेशन , लॉ आणि अन्य पुस्तके तसेच क्लासेसही खर्चिक असतात हया सर्वच गोष्टीचा बारकाईने आणि साधक–बाधक विचार सी.ए.करतांना होणे गरजेचे आहे.

चेतन गणेश दोड , वर्ग ११ वी वाणिज्य

# राष्ट्रगीता करता आजच्या काळात हिंसा की अहिंसा-गरजेची...

आपल्या देशात आज हिंसा मोठया प्रमाणात होत चालली आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या आधी गृहयुध्द हेच देशाचा नाश करणारे हे प्रकार हिंसेचा प्रकार आहे. माणूस नैसर्गिक मृत्यू पाहण्यांच्या आधीच अहिंसेनेच मरणार आहे. कारण माणसाची मनोवृत्तीच तशी बनली आहे. या देशात जर प्रत्येक ठिकाणी हिंसाचार होत राहीली तर या देशाचा विनाश हा नक्की देशातील प्रत्येक नागरीकच करणार आहे.

''काय फायदा त्या स्वांतंत्राचा त्या बलिदानाचा'' स्वातंत्रासाठी लढले जे

स्वांतत्रासाठी मरुनी पडले ते , कारागृहात सडले ते , नाही आठवण त्याची झाली सुरुवात हिंसेची

२) जात पात मतभेद वाढत चालले हे देशाच्या विनासासाठी आठवण करा बलिदान त्यांचे देशासाठी ''लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल'' यांचे मत होते की, देशात एकता हीच महत्वाची आहे. पण ही एकता राष्ट्रासाठी पाहिजे होती. पण आता हा एकतेचा हात पुढे चालला आहे. विश्वासघातासाठी...

'' महात्मा गांधी यांनी मार्ग स्वीकारला होता अहिंसेचा पण झाला कलियुग सुरु हिंसेचाच आपल्यालाच विचार करायला आहे आता मानवतेचा सुरुवात करा आता अहिंसेचा''

कु.स्वाती गजानन बुधे, वर्ग १२ वा वाणिज्य

---

# पर्यटन आणि विकास

निसर्गाच्या सहवासात आनंदाचे क्षण घालविण्यांची आणि नवनविन कला, संस्कृतीविषयी जाणून घेण्यांची माणसाची मुलभूत प्रवृत्ती पर्यटनाचा मूळ आधार आहे. धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला तेवढेच महत्व आहे. आज वेगवान दळणवळणाच्या साधानाने जग जवळ आले असतांना देशाबरोबरच बाहेरचे जगज णून घेण्यांच्या माणसाच्या ओढीने हे क्षेत्र सातत्याने विस्तारते आहे.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थत पर्यटनाची भूमिका महत्वाची आहे. म्हणूनच भविष्याचा वेध घेत या भूमिकेला अधिक महत्व प्राप्त व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संघटनेने यावर्षीच्या जागतिक पर्यटन दिनाला 'शाश्वत पर्यटन विकासाचे साधन' असे घोषवाक्य निश्चित केले आहे.

जागतिक पर्यटन संघटना पर्यटनाला चालना देण्यांच्या दृष्टीने या क्षेत्राच्या विविध पैलूविषयी मार्गदर्शन करते तसेच पर्यटन विकासासाठी कार्य करते. भारतासह या संघटनेचे १५५ सदस्य आहेत. स्पेनमधील चेरोमॉलीनोज येथे १९७९ मध्ये झालेल्या जागतिक पर्यटन संघटनेच्या सभेत १९८० पासून पर्यटन दिन साजरा करण्यांचा निर्णय घेण्यांत आला.

दरवर्षी पर्यटन दिनाच्या निमित्ताने या क्षेत्राशी संबंधित विविध पैलूवर चर्चा घडवून आणली जाते वर्षभरासाठी एक संकल्पना निश्चित करुन त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन जगभरात करण्यांत येते यापूर्वी सांस्कृतीक बंध पर्यटन आणि जैवविविधता, महिलांसाठी संधी, पर्यावरण बदलास प्रतिसाद, क्रिडा आणि पर्यटन, खाजगी क्षेत्राचा सहभाग अशा विविध विषयांवर विचार करण्यांत आला आहे. यावर्षी 'पर्यटन आणि विकास' हा संबंध अधोरेखित करण्यांचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

पर्यटन हा जगातील रसायने आणि इंधनानंतरचा तिसऱ्या क्रमांकाचा मोठा व्यवसाय आहे. जगभरातील अनेक नागरीकांसाठी उत्कर्षाचे साधन आणि जीवनाची आशा म्हणून या क्षेत्राचे मोठे योगदान आहे पर्यटन खेत्राच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांवर अनेकांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. वाहतूक, हॉटेल्स, मनोरंजन आदि व्यवसायही पर्यटनाशी जोडले गेले आहेत. पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थक, आणि पर्यावरण विषयक विकास होण्याबरोबरच पर्यटनस्थळ परिसरात राहणाऱ्या नागरीकांच्या जीवनमानातही बदल घडून येतो. त्यामुळे पर्यटन विकासात नागरीकांचा जेवढा सहभाग वाढेल, तेवढेच त्या भागातील अर्थकारणाला देखील गती मिळते.

कु.पल्लवी शरद इंगोले, वर्ग ११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

# आई

बालपणी बोट चालायला, शिकविणारी आई
हातात लेखन धरुन पाटी वर अ, ब, क
शिकविणारी आई
ताप आल्यावर रात्रभर जागून, सेवा करणारी आई
थकून आल्यावर हातात दप्तर
बजूला ठेवणारी आई
भुक लागल्यावर गरम -गरम
जेवायला देणारी आई
रडल्यावर समजून घालून, प्रेमाने अश्रू पुसणारी आई
खोडकरपणा केल्यावर कान
धरुन रागवणारी आई
आपल्या मागेपुढे आपं गुणगान गाणारी आई
चांगले मार्कस मिळाल्यावर शाबासकी
देऊन गोड 'पापा' घेणारी आई
स्वत-चे दु:ख दुर सारुन
दुसऱ्यांसाठीच झिजणारी आई
आणि आयुष्य दुसऱ्यांसाठी अर्पण
करणारी आई
अशीच असते माझी तुमची आणि
आपल्या सर्वांची आई

कु.गायत्री अनिल कडंगे, वर्ग ११ वी वाणिज्य

---

# शेतकरी

बाबा विठ्ठला
बा विठ्ठला यंदातरी
पडू दे पाऊस
पोट भराची हौस ! आम्हाले
फिटू दे कर्ज
कर वझं कमी
वावर पिकाची हमी ! दे आता
येनं नाई व्हनार
पंढरीले तुझ्या
मातीवरच भाव माहा ! राहू दे

निखिल गावंडे, वर्ग १२ वी कला

# माझा शेतकरी राजा

भरल्या तादात पावसान, सरी माती कालवली
लेकीबाळाची बारामाही, ओवाळी कारे हिरावली

कोरड्या मातीतल्या उभ्या, मक्यालाही कोंब फुटले
रानभन दाटलेल्या दुःखाची, मळयामळयात रडारोब

ऐन दिवाळीया शिवारी, अवकाळाचा थयथयाट
माय : बाप सरकारने, मांडला सत्तेचा सरीपाट

गाईरांचा भिजला चारा, कपाशीचे बोंडही वाऱ्यात
ओली ज्वार-बाजरी-करडई, खरीपाचा घास चिखलात

फळ-फल चिमनी पाखरे, सरं सारं शिवार उदास
पिक उध्दवस्त डोयांन पाहून, गळा उतरत नाही कोरडा घास

दया रे हात समदयांनी, जगाचा पोशिंदयांस
उभा राहिल हिमतीत, पुढच्या वेळी बारोमास

गितेश राजेंद्र पवार, वर्ग १२ कला

---

# आयुष्य

आयुष्यात एकदा
इतका मोठा पाऊस पडावा
कि इगो सगळा वाहून जावा
आयुष्यात एकदा
इतका कडक उन पडावा
की जवळच्या सर्व सावल्यांच
महत्व कळाव
आयुष्यात एकदा
पुन्हा अशी शाळा भरावी
की प्रत्येकाला त्याचे
लहानपन कायमचे लक्षात रहावे
आयुष्यात एकदा
असे जगावे की
आपले जगणे पाहून
इतरांना जगण्यांची मौज कळावी
आयुष्यात एकदा
असी वेळ यावी की
इतरांना आपले महत्व कळावे

जगदिश मारुती गव्हाने,
वर्ग १२ वी कला



Scanned with OKEN Scanner

# अशी किर्ती माझ्या शिवबाची

ज्याला काळजी होती रयतेची
म्हणून केली त्यांनी स्थापना स्वराज्याची
जिजामातांनी शिकवन दिली ज्याला वीरतेची
म्हणून सीमा नव्हती त्यांच्या शुरतेची
शिवराय, दुर्गपती, प्रजापती अशी ओळख त्यांची
त्यांना साथ होती अनेक मावळयांची
त्यांची तलवार होती धारेची
त्यामुळे स्थापना झाली स्वराज्याची
ज्यांच्या मनात होती जिद्द स्वराज्याची
स्वराज्यासाठी तयारी होती प्राण अर्पण करायची
जगभर गर्जना होते त्यांच्या जयजयकाराची
कोणीच विसरणार नाही महती त्यांच्या कार्याची
तीच महान मुर्ती माझ्या शिवबाची
हीच शान आहे आमच्या मराठयांची

कु.निकीता सुनिल अवचार
वर्ग ११ वी वाणिज्य

---

# मुलगी

मुलगी म्हणजे संसाराचा पाया
त्यासाठी अर्पण करते ती काया
मुलगी म्हणजे सुखाचर शिदोरी
सर्व दु:खात असते तिची हजेरी
मुलगी म्हणजे आनंदाची तिजोरी
तिच्यातच असते श्रध्दा आणि सबुरी
मुलगी म्हणजे कौशल्याचा कळस
तिच्यातच असते महाकालीचे धाडस
मुलगी म्हणजे घराची पणती
मग मुलालाच का सर्वश्रेष्ठ मानती
मुलीलाच का रहावे लागते चरणी
जर तिनेच बनवली ही धरणी
स्त्री जन्माला देऊन अधिकार
भृणहत्येला करा नकार!

कु.गायत्री अनिल कडगे
वर्ग ११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

# माझे महाविद्यालय

महाविद्यालय माझे माझे माझे महाविद्यालय माझे माझे माझे रें
जिकडे तिकडे बोल बाला माझ्या महाविद्यालयाचा
झाला ज्ञान देई सर्वाला
महाविद्यालय माझे महान आहे.
दिसायला छान आहे, त्यात मोठे ज्ञान आहे.
महाविद्यालय माझे माझे माझे, महाविद्यालय माझे माझे माझे रे
महाविद्यालयात जावू आम्ही
मिळून गावू आम्ही
सारे गम पधनी
महाविद्यालय माझे माझे माझे महाविद्यालय माझे माझे माझे रें
महाविद्यालय माझे मंदिर आहे
गुरु माझे ईश्वर आहे, गावू गाण त्यांचे रे
महाविद्यालय माझे माझे माझे, महाविद्यालय माझे माझे माझे रे

कु.तेजस्विनी सिध्देश्वर घाटे, वर्ग ११ वी वाणिज्य

---

# शेतकरी

या काळया काळया शेतात, जेव्हा सुर्यकिरणांचा घात
शेतकरी खसला ना हिम्मत, आयुष्याची त्याला किम्मत
आभाळ कोसळण्यांची नाही त्यांना भिती
शेतकऱ्याच्या अंतरंगाला पावसाची किर्ती
तृणपर्णे झाले कोरे तरी आश्रू पस आले वरी
पावसाची एक ना सरी तरी विश्वास त्यांचा देवा–वरी
करणी झाली सुर्याची कमी ना उन्हाची
तरी सुध्दा हिम्मत क्षितीजाला जिंकण्याची
अहर्निश कष्ट करुन स्वभाव शेतकऱ्याचा
स्वकष्टार्जित करुन पोट भरण्यांचा
ब्लाढय त्यांची हिम्मत जिद्द शिखर गाठण्यांचे
बेचला जरी काटा तरी हौसा कष्टाची
बेचिराख झाले तरी चित्त कामात
रात–दिस झाले तरी कष्ट शेतात
झाला रिमझिम पाऊस थिजला शिवार सारा
हरला त्रास शेतऱ्याचा उगला मोत्याचा चारा
शेतकरी झाला आनंदी तरी कष्ट जिगरा, मग भेटे त्यांना पोटाचा आसरा

कु.तेजस्विनी सिध्देश्वर घाटे, वर्ग ११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

# जीवनगीत

जीवनांवर कविता लिहीतांना, घ्यावा लागतो समजून अर्थ
समजून न सांगता
समजून घ्यावा लागतो अर्थ
त्या जगण्याची उत्कटता
अनुभवावी लागते नकळत
प्रवास असतो जीवनाचा
कधी काटयांचा, कधी फुलांचा
क्षणाक्षणात असतो जीवनाचा अर्थ
आपल्याला फक्त
त्याचा विचार करावा लागतो
जेव्हा विचारात घालवावी लागते रात्र
तेव्हा कळायला लागतो
नेमका जीवनाचा अर्थ
दुर्दैवाने नाही कळाल
तर गीत जीवनाच लिहाव लागत

कु.जयश्री गजानन फलटनकर, ११ वी वाणिज्य

---

# विदयारुपी अंगठी

सुंदर अशी असते, विदयारुपी अंगठी
विदयारुपी अंगठीला, शिक्षक असतो संगती
विदयारुपी अंगठीला, शिक्षक देतो चमक
चमकेल जर रत्न, तर उजळून जाईल भाग्य
उजळेल जर भाग्य, तर पूर्ण होईल स्वप्न
विनयरुपी रत्नाला, चैतन्याची शक्ती
चैतन्यशक्तीसाठी असावी लागते युक्ती
असेल ती युक्ती
तर बनेल आपली शक्ती
शिक्षकांची आकांक्षा
जीवनलाटेवर करा फक्त यशाची भाषा
यशाची भाषा
उजळेल आपले भाग्य साथ दया भाग्याला
जीवन उजळेल आपल.

जयश्री गजानन फलटनकर, ११ वी वाणिज्य



Scanned with OKEN Scanner

## निर्णय व अनुभव

आयुष्याचे निर्णय चुकतात
आणि मग आयुष्यच चुकत जाते
कधी कधी तर प्रश्न कळत नाहीत
आणि उत्तरही चूकत जाते.
सोडतांना वाटते सुटत गेल्या गुंता
पण प्रत्येक वेळी एक नवीन गाठ बनत जाते
दाखवणाऱ्याला वाट माहित नसते
चालणाऱ्याचे ध्येय मात्र हरवून जाते.
काही गोष्टी वाटतात तितक्या सोप्या नसतात
अनुभव म्हणजे काय तेव्हाच कळते
जेव्हा एखादी ठेच काळजाला लागते
बीकट परिस्थितीत योग्य निर्णय घेणे कठीण असतं
पण मनाला विचारुन घेतलेला निर्णय हा योग्यच असतो..

कु.वैष्णवी छगनलाल गव्हाणे, वर्ग १२ वी वाणिज्य

---

## मीच जीवन

मी जीवन
मीच संजीवन
मी म्हणजे चैतन्य
मी सळसळता उत्साह
मी ग्रीष्मातील पानगळ
आणि वसंतातील सळसळ
कधी दु:ख नैराश्य, उदासी म्हणजे मी
पडणारे प्रश्न म्हणजे मी
आणि मिळत जाणारी उत्तरही मीच
सजन शिव शक्ती मांगल्याचा
ध्यास म्हणजेच जीवन

कु.गायत्री विनोद सावळे, ११ वी कला



Scanned with OKEN Scanner

# तापमान वाढते पृथ्वीवर

तापमान वाढते पृथ्वीवर, फरक पडतो सृष्टी वर
कारणीभूत कोण?
तुम्ही आम्ही सर्वजण– म्हणून म्हणतो
जगा आणि जगवा झाडांना, फायदा कोणाला
तुम्ही आम्ही सर्वांना
एक झाड जगेल दोनशे, तिनशे वर्ष
मिळे ऑक्सिजन वर्षानुवर्ष
देतो तो तुम्हाला त्यांच्याकडून
नको त्याला काही तुमच्याकडून, म्हणून म्हणतो
लावा एक तरी झाड
मिळेल ऑक्सिजन नातू पणतांना
नाही ते घेतील आक्षेप आपल्यावर
म्हणतील
किती निष्क्रिय होते आपले पूर्वज
लावा एक तरी झाड

कु.निकीता राजेश पांडे, १२ वी कला

---

# मायेची भाकरी

गरम तव्यावरची तिला नाही, कधी पोळायची
भाकरीच्या पदराम मला आईची माया दिसायची
भाकरी थापतांना आई गाणी अशी सुरात गायची
दबलेल्या तिच्या दु:खाची आर्तता मला स्पष्ट ऐकू यायचं
भाकरीच्या पदरात मला आईची माया दिसायची
चुलितला जास्तीचा विस्तव आई पाणी शिंपडून
विझवायची जणू माझ्या मनातला, राग तीन बोलता जपवायची
भाकरीच्या पदरात मला आईची माया दिसायची
ताव्यावरच्या गरम भाकरीवर ओला हात मायेने फिरवायची
काळजाला आज पोळून जाते, आठवन त्या चईट्ट
आवाजाची भाकरीच पीठ कशी आई अगदी
मन लावून मळाची म्हणून तर तव्यावरची भाकरी
तिच्या प्रमाणे फलायची भाकरीच्या पदरात
मला आईची माया दिसायची आई
तु वाढलेली गरम गरम भाकरी कधी मला
पोळायची म्हणायचीस तु, आईची कधी मला नही रे
तुला कळायची तुझ्या हाताची ती
भाकरी आता मला कधी मिळायची
काय घाई झाली होती तुला, मला एकट सोडून जायची
भाकरीच्या पदरात मला आई
तुझी माया दिसायची

कु.नंदिनी अशोक सुरजुसे, ११ वी कला



Scanned with OKEN Scanner

## बहिण

बहिण पाहिजे अशी कधी कधी तिच्यात कधी कधी कोडयात
तर कधी गोडीत बोलणारी
बहिण पाहिजे अशी
कधी सुख वाटणारी, कधी दु:ख वाटणारी
कधी समजून घेणारी, तर कधी समजावून सांगणारी
बहिण पाहिजे अशी
कधी आपलस करणारी कधी अश्रु पुसणारी
तर कधी हक्काने ओरडणारी, बहिण पाहिजे अशी
नेहमी मन जानणारी, सतत हृदयात बसणारी
तर कधी गालातल्या गालात हसणारी
बहिण पाहिजे अशी
योग्य ती वाट दाखवणारी, तर कधी कौतूकाने पाहणारी
संकटात साथ देणारी, बहिण पाहिजे अशी
ओठावर हसू आनणारी, कधी डोळे वटारणी
चुकल तर कान धरणारी, बहिण पाहिजे अशी
मंजूळ पाण्यासाठी दुधाच्या खव्यासारखी
आणि आयुष्यभर साथ देणारी, बहिण पाहिजे अशी
बहिण पाहिजे जिव लावनारी, बहिण पाहिजे अशी
बहिण पाहिजे अशी

कु.नंदिनी अशोक सुरजुस, वर्ग ११ वी कला

---

## मैत्रिण

मैत्रिण असावी तुझ्यासारखी आपलेपणाने सतावनारी
रागवणारी का?विचारुन, तरिही परत परत चिडवणारी
मैत्रिण असावी अशी
माझ्या स्वभावात चुका भरपूर असती, पण एक चांगली गोष्ट आहे.
मी कुठलही नात स्वार्थीसाठी जोडत नाही
मैत्रिण असावी अशी
पण मैत्रिण मध्ये सख्खी, चुलत मावस सावत्र असं
काही नसते मी थेट मैत्रिणचं असते फक्त मैत्रिण
मैत्रिण असावी अशी
मला प्रेमा पेक्षा मैत्रिण महत्वाची आहे, प्रेम तर सगळयांना
एकदा तरी रडवते आणि मैत्रिण ही दु:खात ही हसवते
मैत्रिण असावी अशी
मैत्रिण मध्ये ना खर ना खोट असते मैत्रिमध्ये ना माझ ना
तुझ असते, मैत्रिणचं पारड नेहमी जडचं असतं
मैत्रिण असावी अशी
रक्ताच्या नात्याचं मला माहित नाही पण मैत्रिचं नात्यामध्ये
प्राण असते, म्हणून कदाचित रक्ताची नाती मरतात
मैत्रिण असावी अशी
मैत्रिण सुंदर किंवा कुरुप नसते
कुठल्याही क्षणी पहा मैत्रिण फक्त मैत्रिणचं असते
मैत्रिण असावी अशी

कु.नंदिनी अशोक सुरजुसे, वर्ग ११ वी कला



Scanned with OKEN Scanner

# जिंदगी

जिंदगी सभी को मिलती है दोस्तो मगर वो बेवकुफ
जिंदगी जिनको बजाय उसे कदमो तले रोंदने मे लगे है
वो ये नही जानते की जिंदगी मिलती है एकबार
तो जिलनी चाहीए नही तो जब तक उन्हे
जिंदगी की येहमीयत पता लगती है
तब तक बोहत देर हो जाती है दोस्तो
जब उन्हके पास जिंदगी जिने के लिए होती है
तो वो हमेशा उसका मजाक बनाया करते है
मगर जब वो खुलके जिना चाहते है तो उन्हका
नसीब ही उन्हको मजाक बना देता है
जिंदगी जिन्हे के लिए है तो जिना सिखीये
और एकबार दोस्तो जिंदगी जिन्हे के लिए है
तो उसका मजाक मत बनाईये
नही तो जिंदगी आपका ही मजाक बना देती है
जिन्हे जिंदगी जिन्हे के लिए नही मिली दोस्तो
वो तो बस यही कैहते आये है की
जिंदगी जिने के लिऐ थी
हमे जिने के लिऐ थी, हमे जिना नही आया
हरबात मे नशा था, हमे पिना नही आया
हम तो बस इतना सोचते रहे
कि जिसको समजा हमेशा मजाक
आज उसीने हमारे लाईफ का मजाक बना दिया
मन मे कभी तुफान कभी खामोशी
और कभी परेशानीया होती है
मन मे कभी तुफान कभी खामोशी
और कभी परेशानीयाँ होती है
अपने ही जान और सवालो पे, हैरानीयत होती है
अपने ही जान और सवालो पे, हैरानीयत होती है
इतनी भी आसा नही है जिंदगी दोस्तो
इतनी भी आसा नही है जिंदगी दोस्तो
वो तो जो इसे जिने का हौसला रखते है
उसे भी अपने ही रंग मे रंगा लेती है
इसी लिए एक कवीता है दोस्तो जिससे आप जिंदगी
को बोहत बेहतर जान सकते है, जिंदगी जिंदगी
कभी तुफान है कभी खामोश है
क्यु तू इतनी परेशान है ये जिंदगी
अपने ही जान पे आपने सवालो पे, क्यु तू इतनी हैरा है ये जिंदगी
उलझन जो है तेरी मुझको तू बतला दे, वक्त बेईमान है ये जिंदगी
रहती हू मै तो हर पल सात तेरे, कटते है मेरे संग दिन रात तेरे
फीर हाल से तू मुझको बता

कु.पल्लवी काशिनाथ भुर्रे, वर्ग ११ वी

# वंदनगीत

जिसके सोचने कर दिया कमाल
बदल दिया जिसने देश का हाल
जिसने पढाया सत्य और अहिंसा का पाठ
वो थे हमारे गांधी बापू महान
शुभ रवी या मंगल दिना, बपू गांधीला प्रथम वंदना
भूवर तराया अंधार काया, छाता जनतेचा जन्मा आला
गुलाम गीरीच्या तोडीला बंधना
बापू गांधीला प्रथम वंदना
दुःख किती साहिले आम्ही, गुलाम गीरीत राहिलो आम्ही
इंग्रजा शी केली झुंजना
बापू गांधीला प्रथम वंदना
मुख्या जिवाला फुटली वाणी
म्हणून वैभव गातो गाणी
त्या आनंदाने दिली प्रेरणा, बापू गांधीला प्रथम वंदना

वैभव सिध्दार्थ इंगोले, वर्ग १२ वी कला

---

# SUCCESS

What is meant by the success?

Success is the key of your life which makes life perfect. Success gives us liable life and Respect in society. Success is the part of your life. Which gives perfect shape and to how the right path of life. The meaning of the success is the positive consequences or outcome of an achievement and accomplishment

How to become a successful person in life ? If you think a man is successful if he is rich, so it's totally wrong. Success is attained by your own satisfaction and it is funny that you won't realize that you have succeeded until someone points it out to you to succeed in life. You have to find your own field of an interest and work smart to wads it!

If you wish to get a success, then don't think over about people's just ignore them. Don't need the problems, don't outcome the problems to face the problems by yourself. In fact, meant by me to face the problems selfly is the key of success. Find out your inner ability that's power and positive attitude which makes you a successful person in life.

Success does not depend upon the money, But the success totally depends upon the self-confidence, hard work, positive attitude and positive thinking Belleve in yourself. Have faith in your abilities, without a humble, but reasonable confidence in your own power you cannot be successful or happy person.

**Success Means :**

S - See your goal
U - Understand the obstacles
C - Create a positive mental picture
C - Clear your mind of self doubt
S - Stay on track
S - Show the word you can do it!

Our life is like a camera focus on what's important, capture the good time develop from the negatives and if things don't work out, just take another shot.



Scanned with OKEN Scanner

Just believe in yourself. Don't focus on your problems. Focus on your dreams. Put yourself in situation of opportunity, determination optimism, confidence and surround yourself with good people.

" So only focus on your dreams, Don't be depend upon others
Do self work hard and Get success & be enjoy your life."

Pooja Jagdish Gawande, Class: 12 Com

---

## SUCCESS

You are what your deep driving desire is
As Your desire is so is your will
As Your will is, so is your deed.
" AS your deed is so your destiny."

Success in life is the ability to fulfill your Desire with ease. Success is a journey Dot Destination. Success also includes good health, Energy enthusiasm for life a sense of well being and Peace of mind to enjoy success in life a definite goal is essential If you want joy. give joy to others, if you want Love, love for mankind love for humanity, love for all Living when your waste energy. When your actions are Motivated by love, there is no waste of energy If you can bring your mind and Thoughts under Control there is literally no limit to what one do The human spirit often feels that some thing is lacking in life, each individual is, restlessly searching for love for success for change, for happiness. We do not relies that happiness is never long lasting but please is. If one Finals satisfaction is one Life in ones works, if one comes to team with life's Problems and ups and downs only them can a person Find real peace in life.

Knowledge knows no bounds man by this very basic nature an understanding thirst of knowledge progress in the past century. To achieve something in life, on has to dream and to relies one's dreams one has to work with enthusiasm with persistence and work hard tirelessing

Success doesn't came to the person who desires easy peace but comes to those who works towards it. A strenuous and busy life keeps us to our mind, on the more. There are things to aim at in life. Finds a right goal and then the sustaining strength and will power to accomplish the goal

In our V.N.Arts & AN Cam. Jr. college the efforts are taken to motivate the students to work hard to spend in their life in disciplined manns and develop their awareness about social responsibilities.

AACHAL MANOHAR BHAD, CLASS 12th (ART)

---

## One of Power

One tree can start a forest
One flower can awaken the dream
One smile can begin a friendship
One laugh can conquer a gloom.
One Candle can destroy a darkness.
One sunbeam can light a room.
One breath bring life eternal
One path will lead you home.
One touch can show you can.
One word must start each prayer.
One heart can know what in true
One life can make a difference and that is u.

Ankita Rameshwar Linge, 12th Arts



Scanned with OKEN Scanner

# संत गाडगे बाबा यांचे सामाजिक कार्य

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे या युगात विकासाच्या वाटा प्रशस्त आणि व्यापक झाले आहे. त्याचबरोबर आसक्ती, उपभोग आणि चंगळवादाच्या या झगमगाटात मानवी एकाग्रता चिरंतन ठेवून जीवन अबाधित राहण्यासाठी प्रयत्नाची पराकष्ठा करणे सोईस्कर आहे त्यासाठी वर्तमानात संताच्या प्रबोधनातील सामर्थ्य स्वीकारणे आजच्या काळाची गरज आहे आजच्या वर्तमान काळात सामाजिक जीवन अतिशय गतिमान झाले आहे त्यामुळे सामाजिक आणि सांस्कृतीक प्रश्न निर्माण झाले आहेत आणि या प्रश्नाचे उत्तर संतांच्या साहित्यातून सापडते जीवनाला आत्मीक समाधान प्राप्त करुन देण्यांचे सामर्थ्य संत साहित्यात आहे आधुनिक काळातील मृतप्राय जीवनाला संजीवनाची अमृतकळा प्राप्त करुन देणाऱ्या संत परंपरेत वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा चे कार्य अमौलिक आहे.

''आजच्या कल्याण संताच्या विभूती'' या उक्तीप्रमाणे संत जन्माला येतात हेच सत्य आहे पाशवी प्रवृत्ती सात्वीकतेच्या पातळीवर आणून देवत्वाचा अनुभव घेणे आणि तो मनुष्यत्वाकडे वळून शेवटी देवत्वाचेही विस्मरण होउन मानत्वाकडे जाणे असाच प्रकार संत गाडगे बाबांचा होता यासाठी त्यांनी दहा कलमी कार्यक्रम निश्चित करुन त्याची अमलबजावणी गाडगे बाबांनी स्वत: केली.

या दहा कलमी कार्यक्रमातून गाडगे बाबांनी खऱ्या मानवता धर्माचा पुरस्कार केला स्वत:च्या आप्तस्वकीय यांवर अर्थात घरावरच तुळशीपत्र ठेवले आणि स्वत:ला जिंकून घेण्यांसाठी रंजल्या गांजल्या साठी ''जिवो जीवस्य जीवनम'' या तत्वानुसार प्रत्येक जीवाला आत्म्याला परमेश्वरी स्वरुपात पाहिले आजच्या भोंदूबाबा महाराज यांच्या पाखंडीपणाचा गाडगेबाबांनी पर्दाफाश केला समाजातील अंधश्रध्दा व्यसनाधीनता त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून नष्ठ केली आपल्या आयुष्यात संत तुकारामाला त्यांनी आदर्श मानले दु:खीतांमध्ये रंजल्या गांजल्यामध्ये पीडीतांनामध्ये त्यांना ईश्वर यांचे दर्शन घडते पशूहत्या परबळी हया अघोरी प्रथा नष्ठ करण्यासाठी समाजमन जागृत केले शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा त्यांना अभिमान होता पंजाबरावांनी उभारलेल्या श्रध्दानंद वस्तीगृहात मुलांच्या जेवणासाठी ताठ वाटयांची सोय करुन देणारे मानवतावादी विचारले अधुनिक संत गाडगे बाबा होते आपल्या कणखर वाणीतून त्यांनी तरुन पिढीलाही यथोचित मार्गदर्शन केले आजची तरुन पिढी व्यसनाधीन झालेली दिसते युवा शक्तीचा उपयोग राष्ट्र बळकट करण्यांसाठी झाला पाहिजे त्यासाठी व्यसनमुक्ती ची गरज आहे हे गाडगे बाबांनी पटवून दिले.

संत गाडगे बाबांनी कोणत्याही प्रकारच्या साधनाचा उपयोग न करता अत्यंत सेवाभावी त्यागी वृत्तीने देशातील संकटग्रस्त अपंग दुबळे रोगी समाजव्यवस्थेतील उपेक्षित मानल्या जाणाऱ्या माणसांसाठी आपली सारी हयात चंदनाप्रमाणे नवा झिजवणारा असा महान दृष्टा राष्ट्रसंत या जगाच्या इतिहासात नाही सातत्याने ''हे विश्वची माझे घर ऐसी जयांची मती स्थिर तो आपणाचि जाली'' या ज्ञानेश्वरांच्या वचनाला आचरणात आणणारे गाडगे बाबा एकमेव होते चालते बोलते विद्यापीठ म्हणजे गाडगे बाबा राष्ट्रीय सेवा योजनेचे मूर्तीमंत प्रतीक म्हणजे गाडगे बाबा होय श्रमाची प्रतिष्ठा जागविणाऱ्या गाडगे बाबांनी पडेल ते कष्ठ केले संसार त्यागानंतरही जे कष्ट केले ते समाजासाठी ''परोपकाराय संता विभूताय'' असे म्हटले जाते तेच गाडगे बाबांच्या संदर्भात खरे आहे.

आजच्या वर्तमानात शरीर सुखाचे क्षेत्र विस्तारले आहे अत्यंत वस्तूनिष्ठ आत्मकेंद्री प्रवृत्ती विकास पावत आहे. त्यासाठी आपल्या जीवनाचे आत्मपरिक्षण करण्यांची वेळ आता आली आहे आणि हे आत्मपरिक्षण करण्यासाठी गाडगे बाबांचे प्रबोधन सार्थ ठरते त्यांच्या प्रबोधनातील क्षमता आजच्या वर्तमानात निश्चितच आत्मिक सुखाला प्राप्त करण्यांसाठी कारणीभूत ठरेल हे निसंशय....

प्रा.डॉ.एस.ए.राठोड, मराठी विभाग



Scanned with OKEN Scanner

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शेतकऱ्यांना न्याय

विसाव्या शतकातले असामान्य, अतुलनीय बुध्दीजीवी व्यक्तीमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. ज्यांनी जग आकलनाचा दूरदर्शीपणे बुध्दीच्या सामर्थ्यावर मिळविला होता सुप्रसिध्द मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञ पाल बरण यांनी हुशार आणि बुध्दीजीवी मध्ये फरक आहे. आणि तो फरक म्हणजे हुशारमाणसे त्यांची हुशारी स्वत: करीता स्वत:च्या भल्याकरिता उपययोगात आणतात तर बुध्दीजीवी आपल्या बुध्दीच्या सामर्थ्यावर परिस्थितीचे सुयोग विश्लेषन करुन समाज बदल घडवून आणता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पान बरणाच्या व्याख्येप्रमाणे सर्वोत्तम बुध्दीजीवी मध्ये व्यक्तीमत्वाचे एक असामान्य उदाहरण होय त्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रत्येक पैलू पूर्णत: सामाजाचे न्याय हक्क जोपासणारा आहे.

डॉ.आंबेडकर कृषीविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्याला आर्थिक दृष्टया सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यावरील उपाय त्यांनी स्मॉल होल्डिंग इन इंडीया ॲण्ड देअर रेमेडिज मधून व्यक्त केले आहेत.

डॉ. आंबेडकरांची मुख्य कल्पना अशी होती की स्वांतत्र भारतात ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करील त्याचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे म्हणून औद्योगिरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या लाभासाठी निर्माण करणे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणाऱ्या लाभांची न्याय तत्वावर समान वाटणी आणि आजवर ते वंचित म्हणून जगत आले त्यांना अग्रहक्क देण्यांची गरज त्यांनी वारंवार प्रतिपादन केलेली आहे. डॉ.आंबेडकरांचा भर स्वावलंबनावर होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटिश सरकारला परखडपणे बजावले की, भारतातील कर्जाचा बोजा काही अशी तरी शिरावर घ्यावा आपल्या विश्लेषात बाबासाहेब म्हणतात १९५८ च्या कायद्यापासून लाभ होईल तो इंग्लंडच्या खिशात आणि कर्जाचा डोंगर भारताच्या डोक्यावर डॉ.आंबेडकराचे हे विश्लेषण त्यांच्या प्रखर राष्ट्रीय बाण्याचे प्रतीक होते.

**दामोदर नदी प्रकल्प :-**

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमेटीसमोर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत सरकारचे मजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्यांना हितावह ठरले दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण जात आणि लाखो रुपयांचे नुकसान होत असे दामोदर नदीला पूर येऊ नये त्या पाण्याचा उपयोग शेती विद्यूत आणि वाहतूकीसाठी करता यावा म्हणून दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता मिळविण्यांची शिफारस केली गेली डॉ.आंबेडकर म्हणले की जलमार्ग आणि रेल्वे मार्ग यात काहीच फरक नाही ह्या सत्याची आपण पुरेपुर दखल घेतली नाही आणि जर का रेलमार्ग हा राज्यानुसार विभागला जाऊ शकत नाही तर जलमार्गसुध्दा कोणत्याही हालतीत राज्या–राज्यामध्ये विभागला जाऊ शकत नाही ह्याच्या उलट आपण आपल्या घटनेला जलमार्ग व रेलमार्ग ह्यात फरक करण्यांचा हक्क दिला आहे. ज्यामुळे रेलमार्ग तर केंद्रित समजले जातात पण जलमार्ग हे राज्याचे समजले जातात आणि ह्या चुकीचे खूप सारे वाईट परिणाम दिसून येतात उदाहरणा दाखल जर एखाद्या राज्याला विद्यूत निर्माण करावयाची आहे. आणि त्यासाठी त्याला पाण्याची गरज आहे. पण ते पाणी अडविले असे ठिकाण दुसऱ्या राज्यात आहे व ते राज्य कृषीप्रधान आहे. त्या राज्याला विद्यूत निर्माण करण्यांत कोणताच रस नाही किंवा त्या प्रकल्पासाठी तेवढा पैसा नाही आणि त्यामुळे दुसऱ्यागरज असलेल्या राज्याला ते राज्य ते ठिकाण वापरु देत नाही आपण कितीही तक्रार केली तरी ते राज्य असे अमित्रत्वाचे धोरण अवलंबू शकते आणि प्रोव्हिन्शिअल ऑटॉनॉमीकच्या नावाखाली त्याला न्यायिक ठरवू शकते म्हणून रेलमार्ग व जलमार्ग ह्यात कुठलीही तफावत ठेवू नये कृषीप्रधान देशात पाणी आणि विद्यूत ह्याचा पुरवठा व समतोल असते तर ग्रामिण भारत संपन्न होईल. शिफारस करतांना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली गेली सर्वांनी समान हक्काचा सल्ला देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकार हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते हे सिध्द होते. प्रा.डॉ.एन.बी.मठपती , अर्थशास्त्र विभाग प्रमुख



Scanned with OKEN Scanner

# कार्याचे विभागीकरण

प्रस्तावना :—

एखादया संस्थेचे व्यवसायाचे उदयोगाचे कार्य असते तेव्हा विभागाची निर्मिती करण्यांत येते त्याला विभागीकरण असे म्हणतात प्रत्येक विभागाची कार्य अधिकार जबाबदाऱ्या निश्चिती करण्यांत येतात कार्यरत कर्मचारी प्रत्येक विभागामध्ये दिलेल्या जबाबदारी पूर्ण करतात ते कार्य करण्यांकरिता त्यांना अधिकार सुध्दा देण्यांत येतात तेव्हा आपले कार्य जबाबदारी कुशलतेने पूर्ण करुन संस्थेचा व्यवसायाच्या उदयोगाचा सर्वांगीण प्रगती करित नेहमी तत्पर राहून कार्य करतात.

कोणत्याही उपक्रमाच्या विभागी करणाच्या प्रक्रियेत व्यक्तीगत कार्याची व्याख्या आणि गणना त्यांचे वर्गीकरण आणि त्यांची पूर्तता करण्यांसाठी अधिकाराचे वाटप व व्यवस्थापकांचे अधिकार निश्चित करण्यांची क्रिया म्हणजे विभागीकरण होय''

कुंडझ आणि ओडोनेल

विभागीकरणाची वैशिष्टये

१) विभागीकरण हा संघटन प्रक्रियेचा महत्वाचा एक भाग आहे.

२) विभागीकरणाद्वारे उपक्रमातील कार्य योग्यरित्या पूर्ण करण्याकरिता संघटनेत विविध विभागाची निर्मिती करण्यांत येत

३) विभागीकरणात व्यक्ती आणि कार्याचे गट समूह करण्यांत येतात.

४) विभागीकरणाचा प्रमुख होउ विशेषीकरणाची फायदे मिळून व्यवस्थापनाची कार्यक्षमता वाढविणे

विभागीकरणाची आवश्यकता :—

१) विशेषीकरण उपक्रमाच्या कार्याचे व कार्य करणाऱ्या व्यक्तीचे गट तयार करुन घेणे विभागीकरण्यांचा प्रमुख उदेश आहे

उपक्रमांमध्ये संस्थेमध्ये व्यापारात विविध विभाग निर्माण करुन प्रत्येक विभागातील कर्मचाऱ्याकडे त्यांच्या क्षेमते व आवडीप्रमाणे काम दिल्या जाते प्रत्येकांना नेहमी एकच काम करावे लागते त्यामुळे ते कौशल्य प्राप्त होते व आपल्या कार्यात निष्पात होउन अधिक कार्यक्षेतेने व कुशलतेने कार्य करतात.

२) स्वांतत्र यामध्ये प्रत्येक विभागप्रमुखांना निर्णय घेण्यांचा व अंमलबजावणीचे स्वांतत्र देण्यांत येते त्यामुळे कामकरण्यांचे समाधान मिळते चांगले वातावरण व कार्याची प्रेरणा निर्माण होउन कार्यक्षमता वाढते.

३) संघटनेचा विस्तार यामध्ये समान कार्य एकाच विभागत करण्यांत येतात त्यामुळे व्यवस्थापकाला त्याच्या कार्यावर नियंत्रण ठेवतात विभाग प्रमुखाला व मुख्य व्यवस्थापकाला वेळ मिळतो संघटनेचा विस्तार करुन नवनवीन योजना तयार करु शकतात.

४) जबाबदारी निश्चित :— प्रत्येक विभागाची जबाबदारी विभागप्रमुखावर असते ते आपल्या विभागातील कार्याबदलचे सर्व निर्णय घेवून विविध कार्य करतात व ते कार्य पूर्ण करण्यांची जबाबदारी त्याचीच असते कार्यामध्ये काही उणिवा दोष निर्देश असल्यास संबधित कर्मचारी हा जबाबदार धरण्यांत येते.

५) नियंत्रण प्रभावी विभाग प्रमुख यांना आपल्या कर्मचाऱ्यावर त्यांच्या कार्यावर नियंत्रण व देखरेख ठेवतो मुख्य व्यवस्थापक विभागप्रमुख यावर नियंत्रण ठेवतात यामुळे संघटनेच्या कार्यप्रणालीवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे शक्य होते.

७) कार्याचे मुल्यमापन होते विभागीय कारणामुळे प्रत्येक विभागाच्या कार्याचे मुल्यमापन सहज करता येते व्यवस्थापकीय मुल्यमापनाचे कार्य सुलभ होउन प्रशासकिय कार्यात नियंत्रणात कसल्याही प्रकारच्या समस्या येत नाही.



Scanned with OKEN Scanner

विभागीकरणाचे तोटे :—

१) विकेंद्रीकरणाचे दोष :—

विभागीकरणामुळे अधिकार व जबाबदारीचे विविध विभागांमध्ये वाटप करण्यांत येते त्यामुळे विकेंद्रीकरण होते म्हणजे विकेंद्रीकरण यामध्ये जे दोष आहेत तेच दोष उणीवा विभागीकरणा मध्ये आढळून येतात.

२) कुशल व अनुभवी व्यवस्थापकाचा अभाव प्रत्येक विभागात योग्य कुशल व अनुभवी विभागप्रमुखांची आवश्यकता असते परंतू ते आवश्यकतेनुसार मिळत नाही त्यांची संख्या कमी असल्यामुळे अधिकारी व विभागप्रमुखांची निवड करणे फारच कठीण कार्य आहे.

३) समन्वयाचा अभाव :—

विभागीकरणामुळे प्रत्येक व्यवस्थापक आपल्या विभागाच्या कार्यावर विशेष लक्ष देतात इतर विभागाच्या कार्यासंबधी काही संबंध नसतो त्यामुळे संघटनेच्या विभागात समन्वय नसतो.

४) खर्चामध्ये वाढ निर्माण व्यापार संस्थेमध्ये विविध विभाग निर्माण केल्यामुळे संघटनेच्या व्यवसायामध्ये वाढ होते विभागाची संख्या अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व प्रत्येक विभागाचा प्रशासन वेळ यामुळे खर्चात अधिक वाढ होते.

५) मानवी संबंधाकडे दुर्लक्ष

विभागीकरणामुळे फक्त तांत्रिक बाबीकडे लक्ष दिले जाते मानवी संबंधाकडे नाही संघटनेच्या सर्वांगीन विकासाकरिता कर्मचारी महत्वपूर्ण घटक आहे परंतू त्यांच्याकडे लक्षच दिल्या जात नाही त्यामुळे संस्कृती व मानवी मुलावर विपरीत परिणाम होतो म्हणजे चांगलाच आघात होतो.

प्रा.ए.एन.गजभिये, विभाग प्रमुख वाणिज्य शाखा

---

# भारत-रशिया मैत्री
# काल-आज आणि उद्या काळाची गरज

भारत व रशिया हे दोन राष्ट्र विस्तृत भौगोलीक परंपरा लाभलेली परंतू भिन्न विचार असलेली राष्ट्रे आहेत असे असले तरीही त्यांच्यात शत्रूत्व नसून मैत्रीपूर्व संबंध होते व आहेत मात्र या दोन देशात मैत्री विकसित झाले ते खऱ्या अर्थाने भारताला स्वांतत्र मिळाल्यानंतर दुसऱ्या महायुध्द समाप्ती नंतर शीतयुध्द कालखंडात भारताने ना अमेरीका ना रशिया कडे झुकणे पसंत केले भारत अलिप्त राहून सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा करीत होता मात्र अमेरीका इंग्लंड सारखी राष्ट्रे स्वार्थ हेतूने सहकार्य करण्यांस उत्सुक होती तसे रशियाच्या बाबतीत नव्हेते पंडीत नेहरुंना रशियाचे आकर्षण पूर्वी पासूनच होते कारण रशियाने प्राणपणाने फॅसिझमला विरोध करुन स्वत: बरोबर लोकशाही प्रजासत्ताकाचे रक्षण केले होते पंडीत नेहरुंचा कल रशियाकडे आहे हे ओळखून इंग्रजानी भारताला रशिया पासून नेहमीच दूर ठेवण्यांचा प्रयत्न केला होता.

सन १९४६ च्या भाषणात पंडीत नेहरुंनी रशियाप्रती शुभेच्छा व्यक्त केल्या तर सन १९४७ मध्ये भारताला स्वतंत्र मिळताच पंडीत नेहरुनी त्यांच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडीत यांची भारताच्या राजदूत म्हणून रशियात नियुक्ती केली आणि येथूनच भारत रशिया मैत्री संबधाची सुरवात झाली.

भारत रशिया मैत्रिची सुरवात रशियाने भारताच्या वेगवेगळ्या क्षेत्रात मदत व संबंध प्रस्थापित करुन केली सर्व प्रथम अवजड उद्योग अणुउर्जा अंतराळ संशोधन इत्यादी क्षेत्रात भारताने नेत्र दिपक प्रगती केली त्याचे एक उदाहरण म्हणजे देशाच्या अन्नधान्याची समस्या बिकट असल्यामुळे त्यावर तोडगा काढण्यासाठी पंडीत नेहरु अमेरीका मदत करेल या अपेक्षेने न्युयॉर्क ला गेले परंतू अमेरिकेकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही

अशावेळेस रशियाने आपणाहून भारताला सहकार्य करण्यांचे अन्नधान्य पुरवण्यांचे व त्याची किंमत परकीय चलनाच्या नव्हे तर सांगा कापूस, ज्युट, रबर अश्या कच्या मालाच्या रुपाने द्यावी असे सांगीतले ही घटना सुध्दा भारत रशिया मैत्री दृढ होण्यांस कारणीभूत ठरली.

सन १९५३ मध्ये भारताने कोरियन युध्दाच्यावेळी जी भूमिका घेतली होती त्याचे कौतुक मॉलाकोव्ह यांनी केले आणि यापुढे भारत रशिया मैत्री व सहकार्य भविष्यात अधिक दृढ होतील अशी ग्वाही दिली स्वांतत्र्यापासून भारत रशिया मैत्री संबंध निरनिराळया क्षेत्रात अधिकाधिक घट्ट होत असतांना त्यापैकी एक म्हणजे भारत पाक युध्दात १९७१ मध्ये रशियाने भारताला जे सहकार्य केले त्याची दखल संपूर्ण जगाने घेतली परिणामी भारताला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एक अत्यंत विश्वासू मित्र आहे याची खात्री झाली.

सन १९४७ मध्ये स्वांतत्र्याबरोबर देशाची फाळणी होउन पाकिस्तान अस्तित्वात आले पाकिस्तान १ पूर्व पाकिस्तान व २ पश्चिम पाकिस्तान या दोन भागात होते या दोघांमध्ये सुरवाती पासून राजकिय व सामाजिक ताणतणाव होते पश्चिम पाकिस्तानच्या उर्मट दडपशाही खाली पूर्व पाकिस्तानची दुर्दशा होत होती सन १९७१ पूर्वी बांगलादेश पूर्व पाकिस्तान म्हणून ओळखला जात होता परंतू पाकिस्तान सरकारने तेथील जनतेप्रती चालविलेल्या अन्याय जुलामी व दडपशाही च्या नितीमुळे धास्तावलेल्या पूर्व पाकिस्तानच्या नागरीकांचे लोंढे आश्रयाकरिता भारतात येउ लागले अशा लोकांची संख्या एक कोटीच्या वर गेली यामुळे भारतासमोर गंभीर समस्या निर्माण झाली एक शक्तीशाली लोकशाही राष्ट्र म्हणून अमेरीकेला याची कल्पना देण्यांसाठी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांनी अमेरीकन राष्ट्राध्यक्ष यांची तेथे जाउन भेट घेतली परंतू या समस्येवर उपाय शोधण्याऐवजी निक्सन यांनी श्रीमती इंदीरा गांधी यांना सांगीतले की पूर्व बंगाल बाबतचे पाकिस्तानचे धोरेण ही त्या राष्ट्राची खाजगी बाब आहे त्यात भारताने हस्तक्षेप करुन नये भारताने कोणत्याही प्रकारे पूर्व पाकिस्तान हस्तक्षेप केला तर भारताची आर्थिक मदत बंद करावी लागले उदविग्न मनस्थितीत श्रीमती इंदीरा गांधी यांनी शांतपणे विचार करुन पूर्व पाकिस्तानच्या लढयाला पाठिंबा जाहीर करताच अमेरिकेने पाकिस्तान ला छुपा पाठिंबा दर्शवून इतर राष्ट्रांना भारताविरुध्द लढण्यांस चिथावणी दिली अश्याप्रकारे एका शक्तीशाली लोकशाही राष्ट्राने जगातील सर्वात मोठया लोकशाही राष्ट्राला कोंडीत पकडले पाकिस्तानच्या मित्र राष्ट्रांशी एकटे युध्द करतो तर पराजयाचा कलंक लागेल आणि युध्द करत नाही तर भारताची सामाजिक आर्थिक व राजकिय स्थिती अत्यंत वाईट होते अशा दुहेरी संकटात भारत असतांना रशियाने काही एक अपेक्षा न ठेवता भारताला सहकार्य व मदतीचा हात दिला रशिया मैत्री संबधात ही घटना अत्यंत महत्त्वपूर्व मानली जाते.

पाकिस्तान व भारत युध्द अटळ आहे तसेच भारताच्या विरोधात अमेरिका चीन ब्रिटन फ्रान्स व सौदी इत्यादी राष्ट्र असतांना युध्द करणे भाग पडल्यास अमेरीका किंवा चीन या राष्ट्रांनी युध्दात हस्तक्षेप करु नये यावर प्रतिबंधक उपाय म्हणून भारताने ९ ऑगस्ट १९७१ रोजी रशिया बरोबर २० वर्षाकरिता स्वरक्षण करार केला तो भारत रशिया मैत्री करार म्हणून ओळखल्या जातो यातील महत्वाचे कलम म्हणजे भारत किंवा रशिया या दोन पैकी कोणत्याही राष्ट्रावर इतर राष्ट्रांनी आक्रमण केल्यास दुसरा देश मित्र राष्ट्रास सर्वोतोपरी लष्करी मदत करेल या कराराचे भारतात स्वागत होउन भारताचे मनोधर्य उंचावले पाकिस्तान पूर्व बंगाल मध्ये राजकिय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक क्षेत्रात ही अबाल वृध्द स्त्री पुरुष यांच्यावर अमानुष अत्याचार करीत होते अशातच त्याला इतर देशाचे सहकार्य असल्यामुळे तो उदाम बनला होता म्हणून कोणतीही पूर्व सूचना न देता ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तान ने भारतावर हल्ला केला भारताने युध्द दिर्घकाळ सुरु ठेवू नये म्हणून भारतावर दबाव टाकण्यांसाठी अमेरिकेने पाकिस्तानला मदत करण्यांची घोषणा केली आणि यु.एस.एस.एंटरप्राईज लढाउ जहाज लढाउ विमानसहित बंगाल च्या खाडीत पाठविले चीन सुध्दा पाकिस्तानला मदत करण्यांच्या पवित्र्यात होते ही बाब जेव्हा रशियाला समजली तेव्हा या दोन्ही राष्ट्राला अदल घडविण्यांसाठी तसेच इतर देशांनी पाकिस्तानला मदत करुन नये म्हणून रशियाने विना विलंब त्यांचे १३ व्या कार्यकारी लढाउ समूहाचे (पॅसिफिक फलीट) कमांडर ऍडमिरल ब्लादिमीर कृगोलिया कोव्ह यांच्या नेतृत्वात एक १३ डिसेंबर १९७१ मध्ये अन्न वस्त्राने परिपूर्ण फलाटीला जहाज भारताच्या मदतीला पाठविले तसेच पाठोपाठ पॅसिफिक दहावा ऑपरेटिव्ह गुप पाठवून अमेरिका चीन ब्रिटन फान्स इटली व सौदी राष्ट्रांना धमकी दिली कि तुम्ही भारताच्या भूमिवर एक

जरी हल्ला केला तर तो हल्ला रशियावर आहे असे समजून त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील रशियाच्या धमकीमुळे ब्रिटन व अमेरिका सोडून इतर राष्ट्रांनी माघार घेतली तेव्हा रशियन जहाजे व पाणबुडयांना भारताने लढाउ जहाज विक्रांत येताच ब्रिटन नेही माघार घेतली ह्या घडामोडी पाहून भारत रशियाच्या तयारीत आहे ओळखून अमेरिकेनेही युध्दातून काढता पाय घेतला.

१४ दिवसाच्या युध्दानंतर पाकिस्तान ने ९० हजार सैनिकासह शरणगती पत्कारली युध्द संपले पाकिस्तान पराभूत झाले त्याला मदत करणारी राष्ट्रे खजील झाले भारत रशिया मैत्री किती दृढ आहे हे जगाणे ओळखले पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी लोकसभेत रशियाने केलेल्या मदती बाबत आभार मानले आणि ताबडतोब बांग्लादेश ला नविन राष्ट्र म्हणून मान्यता दिली.

संदर्भ :—


१) वाणि य.श. असा आहे बांग्लादेश श्री यश प्रकाशन मुंबई

२) मोडक अशोक रशिया परराष्ट्र घडामोडी नचिकेत प्रकाशन मुंबई


प्रा.सी.एन.धुगे, इतिहास विभाग प्रमुख

---

# काश्मीर प्रश्नी डॉ. आंबेडकरांची भूमिका

कोणतही तत्वज्ञान तेव्हाच हिताचे किंवा चांगले असते जेव्हा त्या तत्वज्ञानाचा लाभ हा मानवतावादाच्या प्रेरणेतून झालेला असतो विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकिय क्रांती अवकाशात तळपणारा एक वैचारीक तेजोगोल म्हणजे काश्मीरचा प्रश्न!

काश्मिरचा प्रश्न' हा बाबासाहेबांच्या चळवळीतील एक ज्वलंत प्रश्न होता. या प्रश्नासाठी बाबासाहेबांनी आपल्या विधिमंत्री पदाचा राजीनामा दिला. याच प्रश्नावर डॉ. आंबेडकरांनी १९५१ ची सार्वत्रिक निवडणूक लढविली आणि काँग्रेस सत्ताधारी पक्षाशी तेजस्वी झुंज दिली. आपल्या निवडणूकीच्या जाहिरनाम्यात या प्रश्नाला त्यांनी सन्मानाचे स्थान दिले. याप्रश्नाच्या सोडवणूकीसाठी बाबासाहेबांनी सरकार दरबारी अनेक योजना मांडल्या या प्रश्नावर त्यांनी चीन पाकिस्तान यांच्या धोरणाचा धज्जा उडवला आणि भारतीय राष्ट्रीय नेत्यांच्या फसव्या परराष्ट्रीय धोरणावरही ते प्रसंगी विजेप्रमाणे कोसळले देशहितासमोर कोणतीही श्रेष्ठ नाही या नितीला त्यांनी काश्मीरच्या प्रश्नासंदर्भात वेगळा आयाम दिला स्वतंत्र भारताच्या घशात अडकलेला हा काश्मीरचा प्रश्न जोपर्यंत सुटणार नाही तोपर्यंत या देशाला खऱ्या अर्थाने जगताच येणार नाही हे डॉ. आंबेडकरांचे एक महत्वाचे विचारसूत्र होते.

काश्मीर प्रश्नी डॉ. आंबेडकरांची भूमिका :—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ११ आक्टो १९५१ रोजी विधिमंत्रीपदाचा राजीनामा दिला राजीनाम्याचे प्रमुख कारण हिंदूकोड बिलासंबंधीचे होते. परंतु राजीनामा पत्रात जी कारणे दिली त्यामध्ये काश्मीरच्या प्रश्नाचा आणि नेहरूच्या परराष्ट्रीय धोरणांचा विशेष उल्लेख केला आहे. बाबासाहेबांनी परराष्ट्रीय धोरण आणि काश्मीरच्या प्रश्नासंबधी जी भूमिका मांडली ती अतिशय महत्वपूर्ण आहे. डॉ. आंबेडकरांना ज्या गोष्टीबद्दल असमाधान वाटत होते ती गोष्ट म्हणजे परराष्ट्रीय धोरण होय भारताला स्वांत्र लाभले त्या दिवशी जगातील साऱ्या राष्ट्राचे संबंध मित्रत्वाचे होते व ती राष्ट्रे भारताचे शुभ इच्छित होती. आजची परिस्थिती अगदी उलट आहे. आज भारताला खरा मित्र कोणी नाही सर्व राष्ट्रे भारताची शत्रू नसली तरी भारतावर फार नाराज आहे. याला नेहरुचे परराष्ट्रीय धोरण कारणीभूत आहे. भारताच्या ३५० कोटी उत्पन्नापैकी १८० कोटी रुपये सैन्यासाठी खर्च होतात हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे फळ आहे.

काश्मीरची फाळणी

काश्मीरचा प्रश्न भारताला सतत भेडसावत होता. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अनेक विध्वानानी उपाय सूचविले डॉ. आंबेडकरांनी काश्मीरची जातीय आधारावर फाळणी करावी असे सूचविले होते. काश्मीरची फाळणी करणे हाच योग्य मार्ग आहे. असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. हिंदू बौध्द भाग भारताला जोडावा व मुस्लीम भाग पाकिस्तानला जोडावा वस्तूत काश्मीरच्या मुस्लीम भागाशी आपला संबंध नाही तो प्रश्न तेथील

मुस्लीम आणि पाकिस्तान यांच्या मधला आहे. त्याना हवा तसा ते तो प्रश्न सोडवतील तुम्हाला वाटेल तर काश्मीरचा युध्दबंदी भाग , काश्मीर खोरे आणि जम्मू लद्दाख असे तीन भाग करा व सर्वमत घ्या.

लखनौ युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांसमोर या विषयावर भाषण झाले त्या भाषणात बाबासाहेब म्हणाले काश्मीर संघराज्य नसून एक संमिश्र राज्य आहे. त्यामध्ये हिंदू, बौध्द आणि मुस्लिमांचा अंतर्भाव आहे. जम्मू आणि लडाख हा गैरमुस्लिम प्रदेश असून काश्मीर खोरे हा मुस्लीम प्रदेश आहे. भारत हा युनोच्या सार्वमताच्या सहितेशी बांधील आहे. अशा वेळी काश्मिरी लोक मताधिकारी कसा बजावतील हे अगम्यच आहे जर सर्वतम पाकिस्तानच्या बाजूने गेले तर उर्वरित २० टक्के गैरमुस्लिम जनतेचे काय होईल हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. आपण जर पूर्ण काश्मीरला वाचवू शकत नाही तर निदान आपल्याच भागाचे सरक्षण करावे. हे सरळ विश्लेषन नाकारणे अशक्य आहे.

डॉ.आंबेडकरांची सुज्ञ भूमिका :—

डॉ. आंबेडकरांनी काश्मीरचा प्रश्न सोडविण्यांसाठी अनेकदा अनेक सुसंगत उपाय सूचविले परंतू नेहरु सरकारने त्याकडे दुर्लक्ष करुन हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा केला १९४७ मध्ये टोळीवाल्यांच्या मदतीने पाकिस्तानने जेव्हा जम्मू काश्मीरवर हल्ला केला त्यावेळी महार बटालियनच्या शक्तीने संपूर्ण काश्मीर भारतात समिलीत करण्यांची बाबासाहेबांची योजना होती परंतू तिथेही नेहरुंनी आडकाठी आणली आणि युध्दविराम दिला त्यामुळे अर्धा काश्मीरचा भाग पाकिस्तानच्या घशात पडला भरताने हा प्रश्न युनोत नेऊ नये अशी सूचना डॉ. आंबेडकरांनी पंतप्रधान नेहरुंना केली होती त्याकडे दुर्लक्ष करुन नेहरु हा प्रश्न युनोत घेऊन गेले आणि तो अधिक जटिल झाला युनोत भारत आपली बाजू मांडत होता. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी काश्मीरच्या फाळणीची महत्वपूर्ण सूचना केली होती त्यावरही अनेकांनी प्रहार केले काश्मीरच्या फाळणीचे समर्थन करतांना डॉ. आंबेडकरांनी नवशक्तीच्या मुलाखतीत स्पष्टपणे म्हटले. समजा हिंदू व मुसलमानाचे एक अविभक्त कुटुंब होते त्यांनी एकमेकांपासून फुटून निघण्यांचे ठरविल्यावर त्यांच्या संयुक्त मालमत्तेची विभागणी करावयास नको काय?काश्मीर व हैदाबाद हे दोन फाळणी नंतर उरले होते. हैदाबादमध्ये हिंदू बहुसंख्य असल्यामुळे ते भारतात आले. आता उरले काश्मीर त्याबाबत भारताची भूमिका प्रथमपासूनच धरसोडीची आहे. युध्द झाले आणि आम्ही युनोकडे गेलो आता सीमा समिती बनवून आम्ही काश्मीरचे भवितव्य ठरविणार आहोत आज आपल्या सरंक्षण खर्चाचे भार आपणाला झेपत नाही. अशा स्थितीत काश्मीरचा प्रश्न किती दिवस आपण लांबणीवर टाकणार आहोत.

सारांश

काश्मीर संबंधात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब यांनी जो विचार सूचविला होता तो आजही मार्गदर्शक आहे. तो असा काश्मीरची फाळणी करण्यांत येवून बहुसंख्यांक मुस्लीम प्रजेचे सार्वमत घेवून तो प्रदेश पाकिस्तानला देण्यांत यावा व मुस्लिमेत्तर प्रदेश (जम्मू व लडाख) भारताला जोडावा दोन राष्ट्रात ऐक्य साधण्याची यामुळे चांगली संधी निर्माण होईल. डॉ. आंबेडकरांच्या या विचाराची दखल तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनी घेतली असती तर काश्मीरचा प्रश्न कधीचाच सुटला असता भारत आणि पाकिस्तान या दोन देशांना एकमेकांविषयी वैरभाव करण्यांस कारणच उरले नसते.

सद्य स्थितीत काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्या तर काही भाग चीनच्या घशात गेला आहे. आणि उर्वरित भाग भारताकडे आहे या प्रश्नांसंबधी युनो तोडगा काढण्यांस धजावत नाही जम्मू काश्मीरचे नेते राज्याची स्वायत्ता मागत १९५२ सालचे राजकारण करीत आहेत. अतिरेक्यांच्या कारवायांनी हैदोस मांडला आहे. अशा वेळी भारताने जम्मू काश्मीरच्या फाळणीच्या गंभीरतेने विचार केला पाहिजे अखंड भारताचेस्वप्न पाहणाऱ्या सर्व राष्ट्रीय नेत्यांना डॉ. आंबेडकर यांनी लिहिलेल्या थॉटस् ऑन पाकिस्तान या ग्रंथाच्या आधारे फाळणी करावी लागली होती. त्याच फाळणीचा अखेरचा टप्पा हा काश्मीरच्या फाळणीचा आहे. जम्मू काश्मीरच्या फाळणीविषयक बाबासाहेबांनी दिलेला विचार हिच खरी काश्मीरच्या प्रश्नांची उपाययोजना आहे. या विचाराला डावलून काश्मीरचा प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिक क्लिष्ट होईल आणि दोन्ही राष्ट्रांना विनाशाशिवाय काहीच पदरी पडणार नाही.

प्रा.पी.आर.तायडे , राज्यशास्त्र विभाग प्रमुख



Scanned with OKEN Scanner

# खेळाद्वारे व्यक्तीमत्व विकास

व्यक्तीचा शारिरीक बौध्दीक, भावनिक सामाजिक विकास साधून व्यक्तीमत्वाचा सार्वत्रिक विकास करणे हे शारिरीक शिक्षण व खेळाचे महत्वाचे उदिष्टे आहे. व्यक्तीचाबांधा, शारिरीकरोवण, वर्तनविशेष, अभिरुची कर्तत्व व कलागुण यांचा वैशिष्ट्य पूर्ण खेळ म्हणे व्यक्तीमत्व होय

शारिरीक आरोग्यामध्ये व्यक्तीगत स्वच्छता व्यायाम आहार आरोग्य, सवयी, विश्रांती, मनोरंजन इत्यादिचा समावेश होतो. या सर्व गोष्टी शारिरीक शिक्षणांतर्गत समाविष्ठ होतात. मानवी मनावर शारिरीक शिक्षणाचे व खेळाचे योग्य परीणाम होतात. शारीरिक शिक्षणातील योगाभ्यासाद्वारे मानसिक स्वरुपाची प्राप्ती होते. व्यक्तीचे मानसिक स्वास्थ समाजाशी निगडीत आहे. म्हणूनच शारिरीक शिक्षण व खेळाद्वारे शारिरीक, मानसिक, सामाजिक सुस्थिती साधने हे एक उदिष्ट ठरवण्यांत आले आहे. शारिरीक शिक्षण व खेळाद्वारे निर्णयशक्तीचा विकास होतो. शारिरीक शिक्षणातील विविध क्रिंडामध्ये अनेक वेळा तात्काळ निर्णय घेण्यांचे प्रसंग येतात.

भावनांवर नियंत्रण ठेवून त्यांना आवर घालणे मानसिक स्वास्थाच्या दृष्टीणे हितावह असते शारीरिक शिक्षणातील विविध खेळातून जय पराजय यामुळे व्यक्ती आनंद किंवा दु:ख या भावनेचा अनुभव होतो. संघ किंवा खेळत असतांना त्यातून संघनिष्ठा, समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा इत्यादी भावना लागतात.

भावनांवर नियंत्रण ठेवणारी व्यक्ती समाजात योग्य समायोजन साधून आनंदि जिवन जगण्यास लायक बनवते. आत्मविश्वास सदाचार, धैर्य, प्रमाणीकपना, वक्तशिरपना, दया, न्याय, तत्परता, निष्ठा इत्यादी वैयक्तीक गुणांचा विकास शारिरीक शिक्षण व खेळाद्वारे होतो.

त्सेच सहकार्य, बंधूभाव, आदरभाव, सहानुभूती, परोपकार बुध्दी, संघभावना, निष्ठा, खेळाडू वृत्ती, शिस्त इत्यादी सामाजिक गुणांच्या विकासाचे धडे हया माध्यमातून व्यक्तीस मिळतात. शारिरीक शिक्षण व खेळ व्यक्तीस सदाचार व शैक्षणिक मूल्यांचे शिक्षण देते क्रिंडांगणे ही खेळाडूस सदाचारास प्रवृत्त करुन चारीत्र घटविण्यांचे काम करतात म्हणून खेळाद्वारे व्यक्तीमत्व विकास होतो.

प्रा.सुनिल जी. ढाकुलकर
संचालक शा.शिक्षण विभाग

---

# A STUDY OF ENGLISH PROVERB IN LANGUAGE AND LITERATURE

Prakash D. Shrungare
Dept. of English,
Shri.V.N.Arts & Srhi.A.N.Commerce
College, Mangrulpir, Dist. Washim

**ABSTRACT :**

Proverb is one of the most ambiguous aspects of wisdom literature. Proverbs humorously play a vital role to encode the message effectively. It is also the part of informal education which starts from the birth of a child and continues till death. Proverbs do not impart education only but it exercises a great educative influence on the people. Proverbs are the store houses of the wisdom of different races that play an important role in imparting informal education among both the literate and the illiterate people. Proverbs are the mines of traditional knowledge about flora and fauna, fruits and crops, birds and animals, trade and 'commerce and customs and manners etc. Human beings are portrayed and satirized through



Scanned with OKEN Scanner

proverbs. They air mocked at and encouraged by proverbs. Proverbs concentrate on men, women, animals and all other things to teach or satire the circumstances. The paper takes an overview for study of English proverbs and how the proverbs can be a form of literature. There are cultural, politic4 social, historical reflections in proverbs. Proverbs contain metaphors. There is a little bit distinction between the two concepts. Metaphors can be said to have explanatory force like proverb but not have direct force like proverbs. Metaphors are not sentimental and not expressing common truths.

**Introduction:**

Every language and literature play a very important role in learning and teaching process. Languages are made of letters and words and symbols, languages are means and medium of communication. There are several languages all over the world. However English is known an international language. Most of the countries include English as a second language in their school curriculum and children start learning English at a young age. English is the language of media, industry internet, business, diplomacy, tourism, science and more. Literature is the mirror of the society, literature explores darkness to light, veil to vision, innocent to experience and focuses on each institution of the society. Literature represents the culture of the world in the various genres like prose, poetry, short story, novel, drama and more. English literature is the most popular genre in schools, colleges and universities. While learning and appreciating language and literature one has to study its structures and characteristics. Vocabulary, idiom, phrase, sentence, and proverb are aspects of language. Proverbs are in every language, they express metaphorical meanings which intend to teach or satire or mock or ridicule the persons or institutions like social, cultural, historical and more. Idiomatic language makes effective communication and help to develop language skills like listening, speaking, reading and writing. Every culture has a collection of wise sayings that offer advice about how to live your life. Such kind of remarks are called proverb. Online Oxford Dictionaries define a proverb as "A Short, well-known pithy saying, starting a general truth or piece of advice"; whereas Collins English Dictionary defines it as "a short, memorable, and often highly condensed saying embodying, esp. with bold imagery, some commonplace fact or experience". The New Dictionary of Cultural Literacy (Third Edition, 2002) defines proverbs as short, pithy sayings that reflect the accumulated wisdom, prejudices, and superstitions of the human race". In this definition use of the words "prejudices" and "superstitions' is crucially important. Human prejudices and superstitions are reflected in the proverbs of different languages.

It's very humorous to know the really common English proverbs because we hear them come up in conversation all the time. Sometimes people say the entire proverb to give advice to a friend. Someone use proverb like let bygone, be bygone means we should forget all past crisis. The pen is mightier than the sword. It tries to convince people with ideas and words and; is more effective than trying to force people to do what you want. There's no time like the present. It means if you need to do something, don't wait until later. Do it now. Necessity is the mother of invention. When you're really in need, you think of creative solutions to your problems. A watched pot never boils. This proverbial expression refers to the feeling that time seems to go slower when you are anxiously waiting for something to happen. A woman's place is in the home expresses in a



Scanned with OKEN Scanner

variety of forms by numerous people over the ages, all of them men of course. The proper proverbial place for a woman is usually expressed as the home but is and has been also said to be the family and the kitchen. Proverbs help to have the best linguistics competence for effective communication and teaching also. Unknown rural folk created ambiguous speaking style and linguistics named it proverb. Proverb concentrates on problems like agricultural management, social conduct, patriotism, superstitions, woman's position, hospitality medical remedies, meteorological events, customs, beliefs and family relations etc. Rural society and rural community uses proverbs in their day to day conversation as per the circumstances, such proverbs satirize the particular values and cultures. A change is as good as a rest is a proverb that expresses, ma fairly straightforward literal way, the notion that a change from one's regular occupation. The early bird catches the worm means success comes to those who prepare well and put in effort. Joseph Heller's novel Catch-22 is one an idiomatic expression which is a paradox in which the attempt to escape makes escape impossible. The proverbial saying don't keep a dog and bark yourself is an advice that you should not pay someone to do a task and then do it yourself. In this way many scholars use proverbs as pedagogic devices. Proverbs and idioms are blood and guts of a nation. Portrayal of human beings in proverbs is studied in the perspectives of social status, wisdom, character and marriage audits effects on society, culture and psychology; Proverbs reveal the phenomenon of sexism in language and find out solutions to help people reduce and eliminate discrimination against human beings in society and language. Proverb is an aspect of oral literature which plays an important role in confirming traditional ideas in particular. Proverbs are précised and condensed saying frequently used that express general truths or practical precepts. They have their origins in oral tradition and tend to change little from generation to generation. Being transmitters and reflectors of accumulated wisdom, they are generally accepted blindly and are a manifestation of the traditional values of a society.

However, the importance of women was belittled by the society; In addition, in the western culture, women were always connected with some bad aspects, they were often the synonym of vanity; weakness and tears. English has many proverbs that satire these shortcomings of women about character, for example, i. A woman's advice is never to seek. ii. A woman and a glass are ever in danger iii. Women are wavering as the wind. Proverbial language is the symbolic language. Women's inequality and discrimination is reflected in the above proverbs. They always bear a lot in marriage, they have to bear responsibilities of housework and more. They are not respected by their society and husbands. For example proverbs like i. Daughters and dead fish are not keeping wares. ii. It is harder to many a daughter well than to bring her up well. iii. Marry a wife of thine own degree. These proverbs emphasize the center of men in marriage and make women become the commodity and doll. In the first proverb, it reflects the urgent wish to marry daughters but not sons. In a family, the wives and daughters are always not regarded as the real part of the entirety. In the western history; when there were some important fairs in family, the wives could not ask in detail and give her own ideas. They were in the lower position in marriage. In the third example, when a man want to marry someone, he would consider the wife's family status and always wants to marry a woman who can deserve him but not consider his own conditions at first. During the last few decades images of women in proverbs has undoubtedly emerged as one of the



Scanned with OKEN Scanner

of forms by numerous people over the ages, all of them men of course. The proper proverbial place for a woman is usually expressed as the home but is and has been also said to be the family and the kitchen. Proverbs help to have the best linguistics competence for effective communication and teaching also. Unknown rural folk created ambiguous speaking style and linguistics named it proverb. Proverb concentrates on problems like agricultural management, social conduct, patriotism, superstitions, woman's position, hospitality medical remedies, meteorological events, customs, beliefs and family relations etc. Rural society and rural community uses proverbs in their day to day conversation as per the circumstances, such proverbs satirize the particular values and cultures. A change is as good as a rest is a proverb that expresses, ma fairly straightforward literal way, the notion that a change from one's regular occupation. The early bird catches the worm means success comes to those who prepare well and put in effort. Joseph Heller's novel Catch-22 is one an idiomatic expression which is a paradox in which the attempt to escape makes escape impossible. The proverbial saying don't keep a dog and bark yourself is an advice that you should not pay someone to do a task and then do it yourself. In this way many scholars use proverbs as pedagogic devices. Proverbs and idioms are blood and guts of a nation. Portrayal of human beings in proverbs is studied in the perspectives of social status, wisdom, character and marriage audits effects on society, culture and psychology; Proverbs reveal the phenomenon of sexism in language and find out solutions to help people reduce and eliminate discrimination against human beings in society and language. Proverb is an aspect of oral literature which plays an important role in confirming traditional ideas in particular. Proverbs are précised and condensed saying frequently used that express general truths or practical precepts. They have their origins in oral tradition and tend to change little from generation to generation. Being transmitters and reflectors of accumulated wisdom, they are generally accepted blindly and are a manifestation of the traditional values of a society.

However, the importance of women was belittled by the society; In addition, in the western culture, women were always connected with some bad aspects, they were often the synonym of vanity; weakness and tears. English has many proverbs that satire these shortcomings of women about character, for example, i. A woman's advice is never to seek. ii. A woman and a glass are ever in danger iii. Women are wavering as the wind. Proverbial language is the symbolic language. Women's inequality and discrimination is reflected in the above proverbs. They always bear a lot in marriage, they have to bear responsibilities of housework and more. They are not respected by their society and husbands. For example proverbs like i. Daughters and dead fish are not keeping wares. ii. It is harder to many a daughter well than to bring her up well. iii. Marry a wife of thine own degree. These proverbs emphasize the center of men in marriage and make women become the commodity and doll. In the first proverb, it reflects the urgent wish to marry daughters but not sons. In a family, the wives and daughters are always not regarded as the real part of the entirety. In the western history; when there were some important fairs in family, the wives could not ask in detail and give her own ideas. They were in the lower position in marriage. In the third example, when a man want to marry someone, he would consider the wife's family status and always wants to marry a woman who can deserve him but not consider his own conditions at first. During the last few decades images of women in proverbs has undoubtedly



Scanned with OKEN Scanner

emerged as one of the significant themes in the area of social research. Linguists, cultural historian, anthropologists, folklorists and philologists have been exploring various issues from the perspectives of their disciplines. If one can have good command over the proverbial and idiomatic language, he can teach and communicate effectively. So proverbs play a vital role, zestful excellence and an indomitable spirits in English language and literature. The proverbs have universal beauty, everyone can relate to them in some way and on some level. Proverbs offer wisdom and poetry in just one sentence. Actions speak louder than words means actions are a better reflection of one's character because it's easy to say things, but difficult to act on them and follow through. A drowning man will clutch at a straw. When someone is in a difficult situation, s/he will take any available opportunity to improve it. A fool and his money are soon parted. Foolish people do not know how to hold onto their money. Always put your best foot forward. Try as hard as you can or give your best. A picture is worth a thousand words. It is easier to show or explain something through a picture than through words. A stitch in time saves nine. It's better to deal with problems immediately rather than wait by when they worsen and become much bigger. Beauty is only skin deep. A person's character, intellect, and other inner qualities are more important than his! her physical beauty. We have several proverbs that enrich our language and communication skills. Proverbs play an important role in various cultures all across the globe. Proverbs convey wisdom, truth, a discovery of ideas, as well as life lessons. Proverbs have been adopted all over the world and encourage people to work together. This can help people understand society and its way of life. People with different cultures, religious beliefs and languages can interpret many proverbs in the same contexts.

**References :**

1) Journal of Language Teaching and Research, Vol.9, No.2, pp. 424-429,
2) Proverb. Oxford Dictionaries. Retrieved June 17,2014.
3) wwwoxforddictionaiies.com/definition/english/proverb
4) www.collirisdictionaiycom English Dictionary
5) https://wwphrases.org.ulc/meanings/proverbs.html
6) https:J/lemongrad.com/proverbs-with-meanings-and-examples

---

# वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी आयकर बचतीचे मार्ग

आर्थिक वर्ष २०१९—२० करिता सर्व करदात्यांना करनिर्धारण वर्ष २०२०—२१ मध्ये केंद्र सरकारकडे आयकर भरावा लागणार आहे सामान्य परिस्थितीत ज्या व्यक्तीचे उत्पन्न रुपये दोन ते पाच लाखांपेक्षा अधिक असेल त्या सर्वांना आयकर भरावा लागतो आपली कर देयता कमी व्हावी असे प्रत्येक करदात्याला वाटत असते कर देता कमी करण्यांसाठी म्हणजे कायदेशिर मार्गाने करनियोजन करण्यांसाठी पुढील प्रकारच्या उपाययोजना करता येतात.

अ) कलम ८० सीसीसी मर्यादा रुपये दीड लाख

आयकर कायदा १९६१ मधील हे सर्वात लोकप्रिय कलम आहे. या कलमानुसार एखादया व्यक्तीने पुढील प्रकारच्या योजनांमध्ये काही रक्कमा गुंतवलेल्या असतील तर तेवढया रकमेवर वजावट मिळते म्हणजेच त्यावर आयकर भरण्यांची गरज नसते.

१) शासकीय किंवा सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी मध्ये केलेली गुंतवणूक
२) जीवन विमा योजनेमध्ये केलेली गुंतवणूक



Scanned with OKEN Scanner

३) घर खरेदी नोंदणी रक्कम
४) गृहकर्जावर भरलेले हप्ते व्याज व मुदल
५) दोन मुलांची ट्युशन फीस
६) लेस हेल्फ मध्ये केलेली गुंतवणूक
७) नॅशनल पेन्शन स्कीम मध्ये गुंतवलेल्या रक्कमा
८) सुकन्या समृध्दी योजनेतील गुंतवणूक
९) किसान विकास पत्र योजनेतील गुंतवणूक इत्यादी.

यासारख्या योजनामध्ये गुंतवलेल्या रकमांना एकत्रितपणे जास्तीत जास्त रुपये दीड लाख किंवा प्रत्यक्ष गुंतवलेली रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रक्कमेत वजावट मिळेल.

२) कलम ८० सीसीडी (१) मर्यादा रुपये १५०००० या कलमानुसार जर करदात्याने नॅशनल पेन्शन स्कीम मध्ये रुपये दीड लाख पेक्षा जास्त रक्कम स्वच्छेने जमा केले असतील त्याबदल जास्तीत जास्त रुपये ५०००० ची वजावट मिळते म्हणजे एनपीएस गुंतूनी करता रुपये दोन लाखापर्यंत ची वजावट मिळू शकते परंतू सदरील रक्कम वयाच्या साठ वर्षापर्यंत काढता येत नसल्यामुळे यामध्ये अधिकच्या गुंतवणूकीचा सल्ला दिला जात नाही.

३) कलम ८० डी :—

करदात्याने स्वत:च्या किंवा कुंटुबियांचा आरोग्य विमा काढला असेल तर त्याबदल या कलमानुसार वजावट मिळते सामान्य परिस्थितीत ही वजावट रुपये २५ हजार एवढी असेल तसेच पालका करिता आरोग्य विमा काढल्या असेल तर रुपये २५ हजाराची अधिक वजावट मिळेल याव्यातिरिक्त आरोग्य तपासणी करिता केलेल्या खर्चाबदल रुपये ५००० ची वजावट मिळेल या पध्दतीने एकूण रुपये ५५ हजाराची वजावट मिळू शकते.

४) कलम ८० डी.डी.बी.

करदात्याने स्वत:च्या किंवा त्याच्यावर आश्रित व्यक्तीच्या गंभीर आजाराच्या वैद्यकिय उपचाराकरिता केलेल्या खर्चाबदल साठ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या व्यक्तीबदल रुपये ४०००० किंवा प्रत्यक्ष केलेला खर्च यातील कमी रकमेला वजावट मिळेल साठ वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या व्यक्ती करिता ही वजावट रुपये एक लाखापर्यंत मिळेल.

५) कलम ८० ई

करदात्याने शैक्षणिक कर्ज घेतलेले असेल तर त्यावर लागणारे संपूर्ण व्याज वजावट पात्र असेल परंतू कर्जाची परतफेड आठ वर्षाच्या आत करता आली पाहिजे.

६) कलम ८० जी :—

बँकेतील किंवा टपाल कार्यालयातील बचत खात्यावर रुपये दहा हजार पर्यंत मिळणारे व्याज वजावट पात्र असेल.

७) कलम ८० जी :—

करदात्याने वेगवेगळ्या सामाजिक हिताकरिता देणग्या दिल्या असतील तर अशा देणग्यांच्या रखमा पुढील प्रमाणे वजावट पात्र असतील

अ) देणगी रक्कम शंकर टक्के पर्यंत मर्यादे शिवाय मिळणाऱ्या वजावटी
१) केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सुरक्षा निधीला दिलेली देणगी
२) प्रधानमंत्री सहायता निधी
३) सांप्रदायिक सदभावना संस्थेला दिलेली देणगी
४) विद्यापीठ व संस्थेला दिलेली देणगी
५) रक्तसंक्रमण परिषेदेला दिलेली देणगी
६) राष्ट्रीय खेळ निधी सांस्कृतीक निधी
७) राष्ट्रीय बालक निधी
८) मुख्यमंत्री भूकंप सहाय्यता निधी महाराष्ट्र
९) स्वच्छता भारता निधी व स्वच्छ गंगा मिशन निधी



Scanned with OKEN Scanner

ब) ५० टक्के पर्यंत मिळणाऱ्या वजावटी पुढील प्रकारच्या देणगी रक्कमेच्या ५० टक्के वजावट मिळेल
१) जवाहरलाल नेहरू मेमोरियल फंड
२) प्रधानमंत्री दुष्काळ सहाय्यता निधी
३) इंदिरा गांधी मेमोरियल ट्रस्ट
४) राजीव गांधी फांउडेशन
५) रक्तसंक्रमण परिषेदेला दिलेली देणगी
६) राष्ट्रीय खेळ निधी सांस्कृतीक निधी
७) राष्ट्रीय बालक निधी
८) मुख्यमंत्री भूकंप सहाय्यता निधी महाराष्ट्र
९) स्वच्छता भारता निधी व स्वच्छ गंगा मिशन निधी
ब) ५० टक्के पर्यंत मिळणाऱ्या वजावटी पुढील प्रकारच्या देणगी रक्कमेच्या ५० टक्के वजावट मिळेल
१) जवाहरलाल नेहरू मेमोरियल फंड
२) प्रधानमंत्री दुष्काळ सहाय्यता निधी
३) इंदिरा गांधी मेमोरियल ट्रस्ट
४) राजीव गांधी फांउडेशन
८) Standard Deductions वेतन घेणाऱ्या कर्मचारी करदात्यासाठी २०१९ च्या अर्थसंकल्पातून रुपये पन्नास हजाराची स्टॅण्डर्ड डिडक्शन मंजूर करण्यांत आली आहे.

९) कलम ८० यु :—

अपंग व्यक्तींना या कलमानुसार रुपये ७५ हजार ची वजावट मिळेल तसेच गंभीर स्वरुपाचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींना रुपये १ लाख २५ हजाराची वजावट मिळेल.

## कर निर्धारण वर्ष २०२०-२१ करिता आयकर चे दर

| उत्पन्न | दर | रक्कम |
|---|---|---|
| १) रुपये दोन लाख पन्नास हजार पर्यंत | निरंक | निरंक |
| २) रुपये २५०००० ते पाच लाखापर्यंत | ५ टक्के | १२५०० |
| ३) रुपये पाच लाख ते दहा लाखापर्यंत | २० टक्के | १२५००+१०००००+११२५०० |
| ४) रुपये १० लाखापेक्षा अधिक रक्कम | ३० टक्के | ११२५०० + वर लागेल तेवढा कर |

टिप...
१) वरील प्रमाणे येणाऱ्या आयकर रकमेवर चार टक्के आरोग्य व शिक्षण अधिभार लागतो
२) जर उत्पन्न रुपये ५० लागते रुपये एक कोटी या मर्यादित असेल तर आयकर रकमेवर दहा टक्के सरचार्ज लागेल.
३) जर उत्पन्न रुपये कोटीच्यावर असेल तर आयकर रकमेच्या १५ टक्के सर्च भरावा लागेल

रुपये ५००००० लाखाच्या आत उत्पन्न असणाऱ्या सर्व करदात्यांना आयकर कायद्यातील कलम ८७ अ नुसार रुपये १२५०० पर्यंत लागणारा आयकर माफ करण्यांत येतो.

संकलन
श्री लक्ष्मीकांत शिवदास हुरणे
(सहा. प्राध्यापक वाणिज्य विभाग)



Scanned with OKEN Scanner

# ग्रंथालयात संगणकाचा उपयोग

ग्रंथालयात बराच वेळ हा तेच ते काम करण्यांत जातो ग्रंथालयात काम करतांना सुलभता यावी यासाठी संगणक येण्यापूर्वी काही कामे यात्रिंक पध्दतीने करण्यांत आली उदा. छिद्राद्वारे तालीका पत्रावर केलेले पुस्तकाचे वर्गीकरण छिद्रामध्ये काडी घालून विशिष्ट विषयाच्या पुस्तकाची तालीका पत्रे तयार तालिका पत्रामधून सहज वेगळया करण्यांची सोय असे यास पिक—आ—बो सिस्टिम म्हणतात.

मुद्रण कलेच्या शोधापूर्वी दगड धातू भूजपत्र कातडे इत्यादी साधनाचा वापर केल्या जात असे मानवी जिवन हे सतत बदलत जाणारे गतीशील व परिवर्तनशील असल्यामुळे या बाबतीत ग्रंथालये कसे अपवाद असेल हे खालील तालीकेतील मुद्यांचा विचार केल्यास लक्षात येईल.

| | |
|---|---|
| १) १८४० | फोटोग्राफिचा शोध |
| २) १८७० | चलन यंत्राचा शोध |
| ३) १८७७ | ध्वनी मुद्रनाचा शोध |
| ४) १९१० | च्या पहिल्या दशकात व्हिडीओ, चित्रकिती, इतरचित्रवाणी इ. |
| ५) १९३८—४५ | वेल्स व बुश यांची स्वप्ने आज साकार |
| ६) १९४५ | छापाई यंत्राचा शोध |
| ७) १९४५ | नंतरचा काळ संगणक तंत्रज्ञान तसेच चुंबकीय माध्यमाचा काळ |
| ८) १९५० | ग्रंथालयात संणकाचा उपयोग |
| ९) १९५४ | ई—नियतकालीकांची संकल्पना उदयास आली. |
| १०) १९९० | इंटरनेटचे जाळे पसरले तसेच अंकिय ग्रंथालय |
| ११) २००० | आय.टी.ॲक्ट |

ग्रंथालयात संगणकाचे वेगवेगळे तंत्र असल्यामुळे त्यांची कार्य नजरे समोर ठेऊन अशी ल्किप्स तयार करण्यांत येतात ग्रंथालयात दररोजच्या कार्याचा विचार करुन त्यांची निर्मिती करण्यांत येते ग्रंथालयातील विविध कार्याचा विचारकरुन त्यासाठी संगणक कसे वापरता येईल. अशा ग्रंथालय प्रणालीची निवड करावयास हवी ग्रंथालय संगणीकरणाचा विचार करुन खालील प्रमाणे विशिष्ट प्रणाली विकसीत करण्यांत आली आहे.

सोल विद्यापीठ ग्रंथालयातील वाचक वर्ग लक्षात घेऊन अशा प्रकारच्या ग्रंथालयात सर्वच प्रकारचे वाचन साहित्य मोठया संख्येने असतात त्यामुळे ग्रंथालयांना वेगवेगळी कामे पार पाडावी लागतात. संगणकामुळे माहितीचे क्षेत्रामध्ये फार मोठी क्रांती घडून आली ग्रंथालयातील वाचन साहित्यांची साठवणूक एकाच प्रकारची वारंवार देण हया गोष्टी लक्षात घेत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यता प्राप्त या संस्थेने विडोंज पध्दतीवर आधारीत ग्रंथालयामधील सर्व प्रकारची साधन सामुग्री आणि दैनंदिन वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवांच्या व्यवस्थापनासाठी सोल ही संगणक प्रणाली विकसित करुन ग्रंथालयीन संगणकीकरणास मूलभूत कार्य केले वाचकांच्या गरजा लक्षात घेता सोल ही प्रणाली हाताळण्यांस व काम करण्यांस अतिशय सोपी आहे. यामध्ये खालील कामाचा अंतर्भाव असतो.

१) ग्रंथोपार्जन व ग्रंथोपस्कार

२) सिरीयल कंट्रोल

३) देवघेव

४) तालिकीकरण

५) ग्रंथ व्यवस्थापन

ग्रंथालय संगणकीकरणामुळे ग्रंथालय सेवकांचा व वाचकांना वेळ तर वाचतो पण इतरही कामात पारदर्शकता येते ग्रंथालयाच्या कामात अचुकता येत तसेच ग्रंथोपार्जन, तालिकीरण, माहिती संग्रह विकास नियतकालिकावरील नियंत्रण व विशिष्ट विषयाच्या संदर्भसूची हा असलेला संदर्भ ग्रंथ वेळेत मिळण्याच्या ठिकाणाबाबत माहिती मिळते.

डॉ.डी.जी.राठोड, ग्रंथपाल.



Scanned with OKEN Scanner

# MAKE ENGLISH LANGUAGE STUDENT-FRIENDLY THROUGH MODERN TECHNOLOGY

English has its unique importance in our country. It has played a crucial role in building modern India. At present, it is one of the major languages used for communication in the world. In our country we have people living in different states speaking different languages. But here English plays a vital role of a bridge. English is a language which links us with the outside world. Therefore, English is inevitable for our country. As a result, it is very crucial for Indian students to be proficient in English so that they can use the language efficiently for academic purposes and later in professional settings.

English is a compulsory subject in our national curriculum. At present, Indian students learn English as a second language since the very beginning of their primary education with different objectives. At 10 + 2 level the major thirst of the curriculum is on the development of communication skills. Along with the basic language skills of listening, speaking, reading and writing, the skills such as narrating, describing, reporting, summarising, not making, not taking etc have also been focused. In the view of development in the field of information and communication technology, the Board recommends increasing use of technology for implementation of the new curriculum of English at + 2 level. The higher secondary level curriculum of Maharashtra aims at developing communicative competence in students. In the fast developing 21st century various innovative technologies are being introduced to teach English in the classrooms. Knowledge-based is fast doubling and tripling in short a time to cope up with this trend, we have to use modern technologies speech English to students. As we say 'this is the age of science and technology', how can the field of education remains exception to it? Whether we like it or not, technology is everywhere; and in order for our students to survive in post secondary education in this techno-savvy world, they must know technology as well as its use effectively in their learning. Modern technologies available for teachers of English today to develop the communication skills in his pupils are

Computers
Laptop
Language labs
Video library
Overhead projector
Television
Radio
CALL(computer assisted learning)
TELL (technology enhanced language learning)
Programs through educational satellite
Blogger
Smartphone



Scanned with OKEN Scanner

The integration of technology was started in early 1960s and 1970s. In the preliminary stage, people used tape recorders as a technological device to instruct the students, which later evolved as language library. Everyday people are getting access to some new technologies, we join hand with English teaching. As the conventional teaching method as the "chalk and talk" method seems to be outdated, this technologies, can be used as supplement to the classroom teaching method to have a lively atmosphere in the classroom. It is the need of the hour to integrate modern technologies to upgrade the level of English teaching. In the multicultured community, the four basic skills - Listening, Speaking, Reading and Writing - are imparted in the teaching with a variety and novelty. The usage of internet has brought tremendous change in the field of teaching and enhancing English learning.

There are countless reasons why technology is the key aspect of teaching learning in the schools and colleges. There are certain reasons for the importance of technology in improving communication skills:

**Students are digital- native:**

Children are mobile techno-friendly than most adults. It has become the easiest way they learn, because it is such an integral part of their life. Engaging with technology in the classroom has not only helped them learn better, but they also acquired multi -tasking skills.

**New teachers are demanding it:**

The technology has been implemented in higher secondary education as well as other professionals jobs. For new teachers, technology is considered a necessity for the learning environment.

**Students can learn at their own pace:**

We know from years of experience that children learn at their own pace, but sometimes the traditional classroom makes it difficult to do so. With the integration of technology in education, children have the ability to slow down and go back over lessons and concepts and more advanced students can go ahead.

**With technology, there are no limitations:**

Having access to other information outside of the book gives students many different ways to learn a. Technology has changed the learning environment so that learning is more effective.

**Enhance relationship between teachers and students:**

When teachers effectively integrate technology into subject areas, they grow into roles of advisor, content expert and coach. Technology helps make teaching and learning more meaningful and fun. Students are also able to collaborate with their own classmates through technological applications.



Scanned with OKEN Scanner

**Multitude of resources:**

Computers, mobiles, tablets and other forms of technology bring multiple resources for the teachers. They not only keep students engage with exciting new features and apps, but also have other ways to teach students material. Every student learns differently, and technology helps him / her to learn accordingly.

**Integral aspect of professional life:**

Whether we like or not, technology is an essential concept to learn. It is a primary part of every industry and there is no way around it. These days, technology means more than just learning basic computing skills. It has made integral part of every aspect of our lives today and the students who understand it are the ones who succeed in the business world.

Thus, technology helps the students to enhance their language learning in a fruitful way. There is great need to frame course materials and develop methods and strategies so as to enhance LSRW skills of students of higher secondary education. Now a days the concept of quality of education is much talk issue in our educational arena. It is needless to say that we can acquire the quality education by using modern technology in our teaching learning process. Though modern technology has facilitated language teachers to improve their efficiency in teaching, there are many disadvantages of using it in English language teaching. The following are some of the disadvantages of using modern technology in teaching/learning English language --

1. It lacks interaction among the students as well as between teacher and students.
2. It lacks real time effect in the classroom and the students become unable to give feedback to their teachers.
3. Students' logical thinking would be faded away with the excessive use of multimedia technology in teaching.
4. Using modern technology in English teaching is an expensive way of conducting language classes. Not all schools/colleges, particularly in rural area can afford such expenses.
5. Teaching by using modern technology is sometimes prove time consuming activity.

However, despite of its some disadvantages, modern technology is a great asset in teaching/learning communication skills. In fact, modern technology and language teaching have gone hand in hand for long time. In conclusion, the use of modern technology can fully improve the students' ability to improve the basic language skills: Listening, Speaking, Reading and Writing. Overall,the non native speakers of English as a language teachers can teach English more efficiently to improve their communication skills, if they properly make use of modern technology in their teaching learning process.

Shri Pramod Jadhao, Jr. Teacher



Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईकांचे योगदान

वसंतराव फुलसिंग नाईक (१ जुलै १९१३– १८ ऑगस्ट १९७९ महाराष्ट्र राज्याचे तिसरे मुख्यमंत्री व एक कृषीतज्ञ त्यांचा जन्म विदर्भातील गहूली ता.पुसद जि यवतमाळ येथे सधन शेतकरी कुटुंबात झाला नाईकांचे मुळ अडनाव राठोड पण गहूली हे खेडे त्यांचे आजोबा चतुरसिंग राठोड यांनी वसविले त्यांनी जमीन जुमला जमा करुन आपल्या समाजाला स्थिर जीवन प्राप्त करुन दिले साहजिकच ते बंजारा समाजाचे नाईक म्हणून पुढारी झाले त्यावरुन पुढे नाईक आडनाव रुढ झाले.

वसंतरावांचे बालपण गहूली या गावी गेले त्यांचे प्राथमिक शिक्षण पोहरादेवी उमरी भुंजला बाटी या ठिकाणी झाले त्याकाळी वाहनांची सोय नसल्यामुळे ते चार पाच मौल चालत जाउन मोठया जिदीने व कष्टाने शिक्षण घेतले पुढे त्यांनी विठोली व अमरावती येथे माध्यमिक शिक्षण घेवून नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी. ए. ही पदवी घेतली व नंतर एल.एल.बी ही पदवीही मिळविली.

साधारण कुटुंबात जन्मलेले असतांना आणि कसलीही राजकिय पार्श्वभूमी नसतांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणे ही खरी तर आश्चर्याची गोष्ट आहे वसंतरावजी नाईक यांना वाचनाची आवड होती अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक लढा, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा वसंतरावांच्या मनवार प्रचंड प्रभाव पडत गेला नागपूर हे त्याकाळी सामाजिक राजकिय चळवळीचे केंद मानले जायचे नागपुरातील अशा वातारावरणात त्यांची राजकिय सामाजिक जडणघडण झाली आकर्षण व्यक्तीमत्व, मनमिळावू स्वभाव, गरजू गरीब माणसांना मदत करण्यांची वृत्ती यामुळे ते अल्पावधीतच लोकप्रिय झाले

शेती आणि शेतकरी हे त्याचे जिव्हाळयाचे नव्हे तर अभ्यासाचे विषय होते. आपल्या जिल्हयातील शेतकऱ्याचे विविध प्रश्न सोडविण्यांचा सपाटा वसंतरावांनी लावला जनमानसातील प्रसिध्दीमुळे १९५२ च्या विधानसभा निवडणूकीला वसंतराव पहिल्यांदाच उभे राहिले आणि निवडूनही आले उपमंत्री झाले महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात त्यांना महसूल हे महत्वाचे खाते देण्यात आले मारोतराव कन्नमवार यांच्या निधनानंतर वसंतराव नाईक यांना मुख्यमंत्री पद देण्यांत आले. त्यानंतर १९६३ ते १९७५ अशी सलग बारा वर्षे ते मुख्यमंत्री म्हणून राहिले वसंतरावा नंतरच्या कोणत्याच मुख्यमंत्र्याला पाच वर्षाचा टर्म सुध्दा पूर्ण करता आला नाही महाराष्ट्राच्या राजकारणात सलग बारा वर्षे मुख्यमंत्री राहणे ही सोपी गोष्ट नाही वसंतरावांनी ते करुन दाखविले वसंतरावांसारखे सर्वसामान्यांतून आकाराला आलेले नेतृत्व महाराष्ट्राला लाभल्यामुळे राज्याचे भले झाले महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या अत्यंत महत्वाच्या काळात महाराष्ट्रात स्थिर सरकार मिळू शकले परिणामी विकासाला योग्य आणि गतिमान दिशा मिळाली.

बारा वर्ष मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीचा पदभार सांभाळणाऱ्या वसंतरावांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले इ.स. १९७२ या काळात दुष्काळजन्य परिस्थितीत लोकांचे हाल होत होते. अन्नवाचून मृत्यु पावणाऱ्याचे प्रमाण अधिक होते अन्नधान्याचा या समस्येवर संकटावर मात करण्यांसाठी भारतीयांच्या पोटाची खळगी भरण्यांसाठी अमेरिकेकडून पी.एल. ४८० हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा गहू आयात करण्यांत येत होता अशी अन्नधान्याची टंचाई पाहून ''पुढच्या दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी दया'' असे धाडसी विधान त्यांनी केले आणि खरोखर महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत त्यांनी स्वयंपूर्ण करुन दाखविला.

महाराष्ट्र दुधाची गरज पूर्ण करण्यांसाठी गुजरात वर अवलंबून होता त्यावर मात करण्यांसाठी वसंतरावांनी कृषीमंत्री बाळासाहेब सावंत यांच्या मदतीने संकरीत गायीची खरेदी केली आणि दुधोत्पादनासाठी शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज उपलब्ध करुन दिले त्यांच्या या प्रयत्नामुळे अल्पावधीतच महाराष्ट्रात 'धवलक्रांती' घडून आली शेतीला आधुनिक स्वरुप देण्यांसाठी त्यांनी कृषी विद्यापीठाची स्थापना केली महात्मा फुले कृषी विद्यापीठ, मराठवाडा कृषी विद्यापीठ, कोकण कृषी विद्यापीठ या विद्यापीठातील संशोधनामुळे महाराष्ट्राच्या कृषीविषयक ध्येय धोरणात वसंतरावांच्या काळात अमुलाग्र बदल घडवून आला १९७२ च्या दुष्काळात जलसंधारणाची मोठया प्रमाणावर कामे रोजगार हमी योजने अंतर्गत करण्यांत आली पुढे केंद्राने देखिल या योजनेची दखल घेउन महात्मा गांधी रोजगार हमी योजना म्हणून ही योजना देशभरात राबविली आज देखिल ही



Scanned with OKEN Scanner

योजना चालू आहे महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी स्थापना करण्यात आलेल्या पंचायतराज समितीचे अध्यक्षपद वसंतराव नाईक यांच्याकडेच होते लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले त्यांनी केलेल्या पंचायतराज विषयीच्या शिफारसी नुसारच आजच्या जिल्हा परिषद पंचायत समितीचा कारभार चालू आहे मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळवून देण्यात वसंतरावांचा खारीचा वाटा आहे. शेतकऱ्यांना हायब्रीड बियाणे उपलब्ध करून दिले कापूस एकाधिकार योजना राबविली विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बीज आणि पाणी या मूलभूत गरजांची त्यांनी सोय केली पाणी आडवा पाणी जिरवा ही योजना त्यांच्याच काळातील आहे. वसंतराव नाईक जन्म शताब्दी वर्षाचा सांगता समारोहात (१ जुलै २०१३ राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक हे दुरदृष्टी असलेले नेते होते त्यांनी महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेलेच पण देश पातळीवरही भरीव कामगिरी केली असे गौरवोदगार काढले.

कृषी क्षेत्रात वसंतराव नाईक यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी केली जाते. महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पद भूषविणारे मुख्यमंत्री या सामान्य ज्ञानपुरते वसंतराव नाईकांना मर्यादित ठेवून चालणार नाही महाराष्ट्रासाठी अतुलनीय योगदान देणाऱ्या या नेत्याच्या कार्यातून प्रेरणा घेवून आपणही आपल्या क्षेत्रात दमदार कामगिरी करून महाराष्ट्राला अधिक उंचावर नेले पाहिजे.

प्रा.दत्ता ब.जाधव, क.म.वि शिक्षक

---

## पैशाची उत्क्रांती

पुरातन काळात मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा इतक्या गरजा मर्यादित होत्या आणि या गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाला कोणताही मोबदला द्यावा लागत नसत म्हणजे ह्या गरजा अगदी मोफत त्याला पूर्ण करता येत होत्या जसे की अन्नाची गरज पूर्ण करण्यासाठी मानव रानातील कंद शिकारीतून मिळवलेले मास याचा उपभोग घेत असे वस्त्राची गरज पूर्ण करण्यासाठी रानातील झाडांची पान साली उपयोग करीत असे आणि निवाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी रानातील गुफांचा वापर करीत असे.

परंतू मानवाची जसजशी प्रगती होउ लागली तसतशा मानवाच्या गरजा वाढू लागल्या तेव्हा या वाढलेल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आपल्याला काहीतरी कमवावे लागेल त्या करीता आपल्याला काम करावे लागेल याची जाणीव मानवाला होउ लागली आणि याच जाणिवेतून हा मानव आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी व आपली उपजीवीका भागविण्यासाठी शेती हा व्यवसाय करु लागला

शेती व्यवसायातून प्राप्त झालेल्या उत्पादनाची आदला बदल करुन आपल्या गरजा भागविण्याचा प्रयत्न करु लागला म्हणजे आपल्याला हवी ती वस्तू मिळवू लागला तेव्हा एका वस्तूच्या बदल्यात दुसरी वस्तू मिळविणे ह्या देवाण घेवाणाच्या प्रक्रियेला वस्तू विनिमय पध्दती असे म्हणतात.

वस्तूविनिमय पध्दतीत मानव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विनिमयाच साधन म्हणून वस्तूचा उपयोग करु लागला परंतू वस्तूविनिमय पध्दतीत दोन वस्तूचे मुल्य ठरविणे बाहेरगावी जाउन आवश्यक गरजांनी पूर्तता करावी म्हटले तर वस्तू वाहून नेण्यांची अडचण भविष्यात आपल्या गरजा पूर्ण करता याव्यात याकरिता खरेदी शक्ती साठविणे वस्तूच्या माध्यमातून अवघड होउन गेले अशा अनेक अडचणी वस्तूविनिमय पध्दतीत असल्याने मानवाला आपल्या गरजा योग्य पध्दतीने पूर्ण करणे कठीण होउन गेले.

अशावेळी वस्तूविनिमय पध्दतीतील अडचण दूर होउन मानवी गरजा योग्य रीतीने पूर्ण करता येण्यासाठी वस्तूविनिमय ऐवजी देवाणघेवाणीच्या व्यवहारकरिता पैसा ही संकल्पना अस्तित्वात आली म्हणजे पैशाचा शोध लागला त्यामुळे मानवाला विनिमयासाठी आता पैसा ही वस्तू माध्यम म्हणून उपयोगात आणता



Scanned with OKEN Scanner

येउ लागली पैसा म्हणजे अशी वस्तू की ज्या वस्तूत खरेदी शक्ती आहे म्हणजे पैशाच्या सहायाने मानवाला कोणतीही वस्तू विकत घेता येते पैशाचे सुरुवातीला दोन प्रकार होते. त्यातील पहिला धातूचा पैसा तर दुसरा कागदी पैसा होय या दोन्ही प्रकारच्या पैशाचा वापर पैशाचा शोध लागल्यानंतर विनिमय व्यवहारात वस्तू ऐवजी होउ लागला.

सर्वप्रथम पैशाचा शोध लागला त्यावेळी पैशाचा वापर विनिमयाचे साधन आणि मुल्यमापनाचे साधान म्हणूनच होत असे त्यानंतर पैसा हे चलन म्हणून स्वीकारल्याने तसेच पैशात विनिमेयता वहनयता सुज्ञयता सुविभाज्यता सर्वमान्यता मुल्यसंग्रह हे गुणर्ध असल्याचे जाणीव मानवी समाजाला झाल्याने दिवसेंदिवस विविध व्यवहारासाठी पैशाचा वापर मानवाकडून होउ लागला.

त्यामुळे खरेदी विक्रीचे व्यवहार सहज शक्य झाले आणि अर्थव्यवस्था सक्षम होउ लागली कालांतराने पैशाने पतपैसा प्लॉस्टिकचा पैसा हे इलेक्ट्रॉनिक पैसा हे प्रकार अस्तित्वात आल्याने विनिमय व्यवहार अधिक गतिमान झाले परिणामी मानवाची व्यवहार क्षमता विकसित होउ लागली आणि त्याच्या राहणीमानाचा दर्जा सुधारु लागला चैनी नेत्याला जगात येउ लागले त्यामुळेच आज मानवी जीवाला समाधान लाभू लागले ते केवळ पैशामुळेच.

श्री विनोद दौ. कोवे.
क.म.वि.शिक्षक

---

## भारतीय तरुण नवयुवक

तरुण या शब्दात सर्व काही लपलेले आहे तरुण म्हटले की त्याला युथ साहस शौर्य पराक्रम तेज हे शब्द त्याच्या समोर येतात पण आज आपण पहात आहोत तरुण वेगळया मार्गावर भरकटलेला दिसून येतो कारण त्याला लागलेली व्यसनाधीनता कोणत्याही तरुणाला राष्ट्रप्रेमाचे ब्दिजन असायला पाहिजे त्याशिवाय भारत देश सक्षम बनू शकणार नाही आपण तरुणाचे पाच प्रकार पाहणार आहोत त्यामध्ये एक धैर्यवान दोन बुध्दीवान तीन नितीवान चार कर्तृत्वान आणि पाच देशभक्त

यामध्ये आपण तरुणाला खरे म्हणजे त्या राष्ट्राबदल प्रेम, अपुलकी, जिव्हाळा, देश प्रेम असायला पाहिजे उदा. भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, चंद्रशेखर आजाद हे खरे देशभक्त तरुण आपल्या भारतात होउन गेले त्यांनी आपल्या देशाला स्वांतत्र देण्यांसाठी आपल्या जीवाचे बलीदान दिले त्याच प्रमाणे आपला देश स्वतत्र झाल्यानंतर असे अनेक तरुण आपल्या देशात जन्माला आले की ज्यांनी आपल्या देशाला उच्च स्थानावर पोहोचून दिले त्यामध्ये पंडीत नेहरु, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सरदार बल्लभाई पटेल यासारखी नितीवान तरुण मंडळी होउन गेली त्याच प्रमाणे होमी भाभा, डॉ. अब्दूल कलाम, सी.व्ही.रमण यांच्या सारखी तत्वज्ञानी शास्त्रज्ञ मंडळी होउन गेली यांनी आपल्या देशात चांगली प्रगती घडवून आणली यांच्याप्रमाणेच आजच्या युगात देशभक्त कर्तव्यवान पिढी जन्माला येणे अनिवार्य आहे तरुणांनी योग्य प्रकारे शिक्षण घेवून आपल्या देशाच्या प्रगतीमध्ये मोठया प्रमाणात योगदान द्यायला हवे तरुणांच्या सहाय्याने आपल्या देशाची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही आजच्या तरुणांना या गोष्टींची जाणीव करुन देणे अतिशय आवश्यक आहे. तरुण म्हणजे समाज देश त्याग देशसेवा यांचा संगम होय.

आजची तरुण पिढी खूप मोठया प्रमाणावर भरकटलेली आहे त्यांना आपला रस्ता योग्य प्रकारे निवडायला हवा त्यासाठी काही समाजपयोगी संस्था सरकारच्या विविध तरुणाविषयीच्या योजना अमलात अणायला हव्यात की जेणेकरुन आजच्या तरुणांचा रस्ता मोकळा होउन त्यांना देशाची प्रगती करता येईल तरुणांना योग्य समुपदेशनाची गरज सुध्दा आजच्या काळात अतिशय आवश्यक आहे भारत हा बलशाली राष्ट्र आहे भारत हा तरुणांचा देश आहे त्यां तरुणांनी आपल्या प्रयत्नांची मशाल पेटवून आपल्या देशाच्या प्रगतीत योग्य प्रकारे सहाय्य करावे त्या तरुणाला आपल्या राष्ट्राबदल नितांत आदर असायला पाहिजे त्याशिवाय देश, समाज, राष्ट्र पुढे जाउ शकणार नाही.

आजच्या एकविसाव्या शतकात तरुणांना खऱ्या मार्गदर्शनाची आवश्यकता मोठयाप्रमाणावर आहे. कारण आपल्या देशात बेरोजगारी, प्रादेशिक वाद, जमातवाद यासारखे अंतर्गत प्रश्न मोठया प्रमाणावर वाढत चालले आहेत यासारख्या समस्या सोडविण्यांसाठी सर्व तरुणांचा दृष्टीकोन बदलावा लागेल तरुणांनी चांगला दृष्टीकोन ठेवला तरच प्रत्येक तरुण चांगले कार्य करणार आणि सर्वजण योग्य मार्गाला लागतील आणि खऱ्या अर्थाने तरुणांची आपल्या राष्ट्राला समाजाला मदत होईल. प्रत्येक तरुणाने आपल्या देशाला पुढे जाण्यासाठी सहकार्य करावे.

भारतात निर्माण होणारा तरुण वर्ग हा शोधवृत्ती साहसी त्यागी कर्तत्वान प्रगतीपथावर असलेले पाहिजे तरुणांच्या सहायनेच हा आपला भारत देश जगात महासत्ता होउ शकेल त्यासाठी त्यांच्या अंगी निर्णय क्षमता, राष्ट्रवाद, प्रेरणा, कर्तव्य, नेतृत्व आता ही तत्व अंगी असावी तरच देश पुढे जाईल.

प्रा.एस.एन.टापरे
क.म.वि.शिक्षक

---

## ❋ स्त्री ❋

आज भारताला स्वातंत्र मिळून ७२ वर्ष पूर्ण झाली संपूर्ण भारत स्वांतत्रयामध्ये वावरतो परंतू भारतीय स्त्री स्वंतत्र झाली का? तिला स्वंतत्रपणे वावरता येते का?तर नाही ती आजही पारतंत्रयामध्ये जीवन जगते. ज्या देशाला आपण माता म्हणतो त्या देशातील माता सुरक्षित आहे. का?जी माता जी स्त्री पुरुषाला जन्म देते त्याचे पालनपोषण करते तोच पुरुष स्त्रियांची विटंबना करतो तिची हत्या करतो अशा नराधमांना लाज का वाटत नाही.

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वश्रेष्ठ संस्कृती समजली जाते या सर्वश्रेष्ठ संस्कृतीमध्ये स्त्रियांचा मान सन्मान कुठे आहे. एक स्त्री अनेक भूमिका पार पाडते आईच्या भूमिकेत मुलांवर जीवापाड प्रेम करते एक बहिण म्हणून भावांला जपते एक पत्नी म्हणून पतीला जीवनभर साथ देते सर्वांच्या भानेवर विचार करते सर्वांचे सरंक्षण करते तिचे संरक्षण करण्यांस का कुणी समोर येत नाही जेव्हा तिची विटंबना केली जाते हत्या केली जाते या घटनेनंतर सर्व समाज जागा होतो हातामध्ये मेनबत्ती घेऊन



Scanned with OKEN Scanner

रस्त्यावर येतो जीव गेल्यानंतर काय अर्थ जेव्हा तिला गरज असते तेव्हा मदतीला कुणी नसत तिला किती वेदना होत असतील त्रास होत असेल हे फक्त एक स्त्री समजू शकते एका स्त्रीची विटंबना म्हणजे जगातील सर्वच स्त्रियांची विटंबना होते.

असे म्हणतात की एका यशस्वी पुरुषामागे स्त्रियांचा हात असतो हे खरेच माता जिजाऊ ने शिवाजी महाराज यांना घडविले माता सावित्रीने ज्योतिबा फुले यांना साथ देऊन मुलींना शिक्षण दिले माता रमाईने कष्ट करुन डॉ. आंबेडकरांसारखे विद्वान घडविले या सुध्दा स्त्रीयाच होत्या. अर्थातच एका स्त्री चा अपमान म्हणजे या मातांचा अपमान नव्हे का?यांची विटंबना नव्हे का? याची हत्या करतांना कुणाला लाज का वाटत नाही एकीकडे भारत सरकार ''बेटी बचाओ बेटी पढाओ'' ही मोहिम हाती घेतो दुसरीकडे रोज मुलींचे शोषण केले जातात विटंबना केले जातात विटंबना केली जाते. हत्या केली जाते याला जवाबदार कोण?पुरुष, समाज, सरकार, सोशल मिडीया कि निसर्ग ज्याने पुरुषामध्ये वाईट प्रवृत्ती निर्माण केल्या अलीकडे शाळेसारख्या पवित्र ठिकाणी विचित्र घटना घडतात लहान मुलींना दिशाभूल करतात त्याचे शोषण करतात आणि त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात ही आहे का भारतीय संस्कृती हा आहे का ''मेरा भारत महान'' आज समाजाला जागृत होण्यांची गरज आहे. घटनेने जरी स्त्री—पुरुष समानता हा अधिकार दिला तरी आपल्याला स्त्री—पुरुष हा व्यक्तीभेद नष्ट करावा लागेल शाळेमधून महाविद्यालयामधून स्त्रिविषयक शिक्षण देण्यांची गरज आहे. जसे की स्त्रियांचे सरंक्षण करणे स्त्रियांचा आदर करणे सन्मान करणे हे नैतिक मूल्य म्हणून प्रत्येक भारतीय जबाबदार नागरीकाने पाळणे गरजेचे आहे. प्रत्येक आईने आपल्या मुलांना संस्कार गरज आहे. तेव्हांच स्त्री ही सुरक्षित होईल.

स्त्री एक महाशक्ती आहे,<br>
स्त्री ही सर्वश्रेष्ठ आहे<br>
स्त्री ही जगाला मिळालेली,<br>
मौल्यवान देणगी आहे<br>
या मौल्यवान देणगीला जपा,<br>
सुरक्षित करा, आदर करा,<br>
सन्मान करा

When wealth is lost nothing is lost<br>
When health is lost something is lost<br>
When character is lost everything is lost

प्रा.कु व्ही.यु.इंगोले



Scanned with OKEN Scanner

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि.वाशिम. द्वारा संचालित

# श्री.वसंतराव नाईक कला महाविद्यालय,
# श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर.

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि.वाशिम.
द्वारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य
महाविद्यालय, मंगरूळपीर, जि.वाशिम.

Takwale-9422939916 / 37

Scanned with OKEN Scanner